घटक १

# केशवसुत, वसंत बापट

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ केशवसुत यांची कविता

१.२.२ वसंत बापट यांची कविता

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्ट्ये :

विद्यार्थी मित्रहो, काव्यगंध या पुस्तकामध्ये आपल्याला विविध कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवींच्या कवितेचा अभ्यास करायचा आहे. या घटकामध्ये आपल्याला १८८५ नंतर काव्यलेखन करणाऱ्या कवींच्या कवितेचा अभ्यास करायचा आहे. या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला,

- आधुनिक मराठी कविता समूजन घेता येईल.
- केशवसुत आणि वसंत बापट यांच्या काव्य लेखनाचे विशेष समजून घेता येईल.
- केशवसुत आणि वसंत बापट यांच्या कवितेचा  रूपबंध, शैली समजून घेता येईल.
- केशवसुत आणि वसंत बापट यांच्या कवितेचे विशेष समजून घेता येईल.

## १.१ प्रस्तावना :

मराठी कवितेला एकूण परंपरा सातशे वर्षांची आहे. मध्ययुगीन मराठी कवितेची परंपरा ज्ञानेश्वरांच्या कवितेपासून सुरू झालेली असून ती अठराव्या शतकाच्या अखेरीस संपुष्टात आलेली दिसते. १८१८ च्या सुमारास इंग्रजी सत्तेला येथे प्रारंभ झाला. या राजकीय सत्तांतराचा परिणाम येथील संस्कृतीवर मोठ्या प्रमाणात झाला. इंग्रजी सत्तेमुळे जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलला जाऊ लागला. इंग्रज येथे आले तेच मुळात नवी मूल्ये, नव्या संकल्पना, नव्या जाणिवा घेऊन. एकोणिसाव्या शतकाचे एक सर्वाधिक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या शतकाने मानवाचे बळ, मोल व प्रतिष्ठा जपणारे इहवादाचे तत्त्वज्ञान रूजविले.

एकोणिसावे शतक हे अनन्यसाधारण स्वरूपाचे होते. महाराष्ट्रात राष्ट्रवादी आणि समाजसुधारणावादी विचारांची कास धरली गेली. त्यामुळे इंग्रजांचे आगमन ही गोष्ट महत्त्वाची होती.

मानवाच्या जीवनव्यवहारात अभूतपूर्व अशी वैचारिक क्रांती या काळात झाली. ज्ञानाचा आणि विज्ञानाचा वेग वाढला. यामुळे मानवी जीवन विविध सुख-सोयींनी युक्त झाले. परंतु महत्त्वाचे म्हणजे या शतकाने काही मूल्यांचा आग्रह धरला. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर उदयास आलेल्या स्वातंत्र्य-समता-बंधुता या मूल्यत्रयीला एकोणिसाव्या शतकाने जन्माला घालते. 'मानवी संस्कृतीच्या केंद्रस्थानी याच शतकात राष्ट्रवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, व्यक्तिवाद इत्यादी स्वरूपाची तत्त्वज्ञानेही जन्माला आली. युरोपात सतराव्या-अठराव्या शतकात वैज्ञानिक आणि औद्योगिक अशा दोन क्रांत्या झाल्या. प्रत्येक गोष्ट देवदत्त नाही. मानव स्वत: काही निर्माण करू शकतो, निसर्गाला तो आपल्या जीवनासाठी काबूत आणू शकतो आणि मुख्य म्हणजे आपले स्वत:चे जीवन शंभर टक्के देवदैवावर न सोडता, त्याला पाहिजे तो आकार देऊ शकतो, हे इहवादी (सेक्युलर) तत्त्वज्ञान पृथ्वीवरील विविध मानव समाजात रूजत गेले. हिंदुस्थानात इंग्रज आले आणि त्यांच्यासोबत प्रबोधन युगातल्या नव्या जाणिवा, नवे ज्ञान, नवे तत्त्वज्ञान आणि इहवादी विचार या गोष्टी आल्या. ''एकोणिसाव्या शतकाचे सर्वांत मोठे फलित म्हणजे माणसाने स्वत:चा, स्व-मनाचा शोध आरंभिला. याचा परिणाम वाङ्मयावर, विशेष करून मनाच्या जास्तीत जास्त जवळ असणाऱ्या कविता या वाङ्मय प्रकारावर झाला. कवितेचा विषय आता बाहेरून कोठून तरी न येता, मनातून उफाळून येऊ लागला. आत्माविष्कार हे कवितेचे ध्येय बनले. यामुळे काव्यासंबंधीचा दृष्टिकोणच बदलून गेला.'' (पुंडे द. दि. / तावरे स्नेहल - प्रस्तावना - त्रिदल (पृ. ३).

सन १८७५ ते १९२० हा मराठी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचा काळ होता. आपल्याला या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या केशवसुत आणि त्या नंतरच्या काळातील वसंत बापटांच्या काव्यलेखनाचा अभ्यास करायचा आहे.

## १.२ विषय विवेचन :

प्रस्तुत घटकामध्ये केशवसुत आणि वसंत बापट यांच्या कवितेचा अभ्यास आपल्याला करायचा आहे.

## १) केशवसुतांची कविता :

**अनुक्रमणिका**

**१.० उद्दिष्ट्ये**

**१.१ प्रस्तावना**

**१.२ लेखक परिचय**

**१.३. विषय विवेचन**

**१.३.१ अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न**

**१.३.२ नवा शिपाई**

**१.३.३ तुतारी**

**१.३.४ मजुरावर उपासमारीची पाळी**

**१.३.५ गोफण केली छान**

**१.४ सारांश**

**१.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ**

**१.६ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे**

**१.७ सरावासाठी स्वाध्याय**

**१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके**

### १.० उद्दिष्ट्ये

केशवसुतांच्या अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न, नवा शिपाई, तुतारी, मजुरावर उपासमारीची पाळी, गोफण केली छान या कविता अभ्यासल्यानंतर आपणास,

- केशवसुतांच्या कवितांचे आकलन होईल.
- केशवसुतरांच्या कवितेतून येणाऱ्या सामाजिक जाणिवा लक्षात येतील.
- नवी जीवनमूल्ये आणि नवी रचना यांचा केशवुतांच्या कवितेतील मिलाफ लक्षात येईल.

## १.१ प्रस्तावना :

मराठीत आधुनिक कवितेची सुरवात केशवसुतांच्या काव्यापासून झाली. १८८५ ते १९२० पर्यंतच्या काळातील हे काव्य इंग्रजी वाङ्मयाच्या प्रभावातून निर्माण झालेले होते. या आधीच्या काळातील काव्य हे पौराणिक विषयातील कथानकात रमणारे होते. पण १८८५ नंतर मात्र निसर्ग, समाज, माणसाचे दैनंदिन जीवन, देशप्रेम इ. नित्याच्या विषयांवर काव्यलेखन होऊ लागले. विषय आणि अभिव्यक्ति या दोन्ही दृष्टींनी त्यात आधुनिक जाणिवेची कविता लिहिली हे जितके महत्त्वाचे आहे तितकेच त्यांनी आधुनिक कवितेबद्दल एक नवेच भान समकालीनांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला. नव्या आशयाची, नव्या जातीची कविता त्यांनी लिहिली. इंग्रजी कवितेचे अवलोकन करून कवितेविषयी नवी दृष्टी स्वीकारली आणि ती मराठीमध्ये रुजविली. इंग्रजी कवितेतील स्वच्छंदतावाद (रोमँटिसिझम) केशवसुतांनी मराठी कवितेत आणला. त्यामुळे कोणताही विषय कवितेला वर्ज्य नाही असे चित्र उभे राहिले. मानवी जीवनातील सुख-दुःखे, प्रेम, आशा-निराशा, भाव-भावना मानवी जीवनाचे श्रेय याबरोबरच मानव आणि निसर्ग यांच्या परस्परसंबंधाविषयीचे कुतूहल हे काव्यविषय हाताळले जाऊ लागले.

## १.२ लेखक परिचय :

कृष्णाजी केशव दामले तथा केशवसुतांचा जन्म इ. स. १८६६ साली मालगुंड (जि. रत्नागिरी) येथे झाला. त्यांचे वडील प्राथमिक शिक्षक होते. शिक्षणासाठी त्यांना ठिकठिकाणी वास्तव्य करावे लागले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी स्थापन केलेल्या पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमधून ते १८८९ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांना या शाळेत असताना टिळक आणि आगरकर हे दोघेही शिक्षक म्हणून लाभले होते. यावरून केशवसुतांच्या जडणघडणीत सामाजिक आणि राजकीय जाणिवेची बीजे रुजली असणार हे लक्षात येते.

वडिलांच्या हाताखाली प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते इंग्रजी शिक्षणासाठी बडोद्यास आपल्या बंधूकडे श्रीधरपंतांकडे गेले, पण या बंधूच्या अकाली निधनामुळे आठ-दहा महिन्यातच त्यांना बडोदे सोडावे लागले. १८९० ते १८९६ दरम्यान त्यांनी मुंबईत मिशन स्कूलमध्ये शिक्षक म्हणून व खासगी शिकवण्या, कमिसरेट ऑफिसमध्ये हंगामी कारकुनाची अशा नोकऱ्या केल्या. १८९६ ते १८९७ च्या सुमारास प्लेगमुळे त्यांना मुंबई सोडावी लागली. त्यानंतर खानदेशातील फैजपूर, भडगाव अशा ठिकाणी नोकरीच्या निमित्ताने ते १९०३ पर्यंत फिरत राहिले. सन १९०३ मध्ये धारवाड येथे सरकारी नोकरी त्यांना मिळाली. ७ नाव्हेंबर १९०५ च्या सुमारास हुबळी येथे प्लेगने त्यांचा वयाच्या ३९ व्या त्यांचा वर्षी मृत्यू झाला.

'केशवसुत' या टोपण नावाने त्यांनी काव्यलेखन केले. त्यांच्या उपलब्ध कवितांची संख्या एकूण १३५ आहे. त्यांनी काही इंग्रजी कवितांचेसुद्धा लेखन केले. इंग्रजी सॉनेटच्या अनुकरणातून 'सुनीत' हा काव्यप्रकार मराठीत आणण्याचे श्रेय त्यांना जाते. त्यांच्या मृत्यूनंतर कवितासंग्रह प्रकाशित झाला.

## १.३ विषय विवेचन :

केशवसुतांनी सामाजिक जाणिवेची कविता लिहिली. त्याबरोबरच आधुनिक कवितेबद्दल एक नवे भान

समकालीनांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला. केशवसुतांची कविता ही नव्या आशयाची, नव्या जातीची होती. त्यांच्या कवितेने युगप्रवर्तनाचे महत्त्वाचे कार्य केले. मानवी जीवन संकुचित करणाऱ्या अनिष्ट रुढी, प्रथा-परंपरांना मूठमाती देणाऱ्या बंडाचे निशाण त्यांनी उभारले. आधुनिक मराठी कवितेत केशवुतांचा मान पहिला आहे. कारण त्यांनी रूढी-परंपराग्रस्त जग उलथून टाकण्याचा, अखिल भेदांना विसरून समतेची दृष्टी फिरवण्याचा युगधर्मच आपल्या कवितांतून आविष्कृत केला. केशवसुतांच्या बरोबरीने विष्णू मोरेश्वर महाजनी किंवा म. मो. कुंटे यांच्यासारखे काही कवी नवी कविता लिहित होतेच, परंतु केशवसुतांनी कवितेची नवी वाट चोखाळली आणि इतरांसाठी ती खुली करून देण्यासाठी स्वत:ची कवित्त्वशक्ती खर्च केली. प्रस्तुत अभ्यासपत्रिकेसाठी केशवुतांच्या 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न, नवा शिपाई, तुतारी, मजुरावर उपासमारीची पाळी आणि गोफण केली छान' या निवडक पाच सामाजिक जाणिवांच्या कवितांची निवड केली आहे.

### १.३.१ अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न :

अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न ही कविता भारतातील जातीव्यवस्थेवर प्रहार करणारी कविता आहे. दुसऱ्याचे स्वायत्त व्यक्तित्त्व नाकारून, त्यांना कनिष्ठ लेखून बंधनात टाकणाऱ्या, नाडणाऱ्या प्रवृत्तीचा निषेध या कवितेत केला आहे. केशवसुतांच्या स्वातंत्र्याचा आविष्कार हा कलेपुरता मर्यादित नव्हता. त्यांची बंडखोरी ही जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील होती. माणूस हा नैतिक कर्ता आहे. तो केवळ सृष्टिनियमांनी बांधलेला नाही, ही त्यांची धारणा होती. त्यामुळेच माणसाच्या स्वायत्ततेला, स्वातंत्र्याला बाधा आणणाऱ्या सर्व गोष्टींवर त्यांनी प्रहार केला.

गावकुसाबाहेरच्या रस्त्याकडेला अस्पृश्यांची मुले खेळात दंग आहेत. त्यावेळी एक विप्र (ब्राह्मण) तिथून जात आहे. या मुलांची सावली अंगावर पडून विटाळ होईल, अशी भ्रामक कल्पना त्याच्या मनात आहे. त्यामुळे मुलांना तो तिथून दूर जायला सांगतो. सर्व मुले पळून जातात. पण त्या मुलांमध्ये एक मुलगा तिथेच उभा राहतो तेव्हा चिडलेला विप्र त्या मुलाच्या अंगावर काठी घेऊन जातो. त्या ब्राह्मणाच्या चिडण्याचे कारण त्या मुलाला कळत नाही. तो मुलगा घरी जातो आणि आपल्या आईला, 'सावली पडल्याने काय होणार आहे?' असे विचारतो. तेव्हा त्याची आई त्याला सांगते,

'आम्ही नीच बा, आणि ते लोक थोर, तया पाहता होईजे नित्य दूर.' आपण नीच असून हे लोक मोठे आहेत. त्यांना पाहता आपण बाजूला सरकावे.' असे त्याची आई त्या मुलाची समजूत काढते. इथे मुलांच्या अंगावर जाणारा ब्राह्मण, खेळणारी मुले, मुलाची समजूत काढणारी आहे. अशी विविध केंद्रे या कवितेला आहेत. वरकरणी ही कविता साधी वाटत असली तरी भारतीय जातिव्यवस्थेवर ती प्रहार करते. सामाजिक प्रश्नांवर लिहिलेली ही केशवसुतांची पहिली कविता आहे. समकालीन अस्पृश्यताविषयक परिस्थितीचे चित्रण करणारा एक प्रातिनिधिक प्रसंग येथे कवीने हाताशी घेतला आहे. अस्पृश्य स्त्रियांची मानसिकता या कवितेतून लक्षात येते. 'स्पृश थोर, आपण नीच' ही भावना त्यांच्या मनात कशा प्रकारे रुजली आहे, याचे दर्शन या कवितेत होते. कविता अतिशय साध्या शब्दांत कवीने मांडली आहे. चित्रमयता हा या कवितेचा विशेष येथे सांगता येईल.

सुमारे एकशेतीस वर्षापूर्वी सामाजिक परिस्थितीचे भीषण चित्र यातून डोळ्यांसमोर उभे राहते. या भीषणतेच्या जाणिवेतून या कवितेचे लेखन झाले आहे.

### १.३.२ नवा शिपाई :

तुतारी संप्रदायायतील महत्त्वाची कविता म्हणून 'नवा शिपाई' या कवितेकडे पाहिले जाते.. तुतारी या कवितेच्या केंद्रस्थानी संपूर्ण मानव समाज आहे. त्यामुळे या मानवाला उद्देशून येथे उपदेश केला आहे. या कवितेत समाजात सुधारणा करायला गेलेल्या, क्रांती करू पाहणाऱ्या माणसाचे तत्त्वज्ञान विशद केलेले आहे. 'शिपाई' हा शब्द सुधारणा करण्यासाठी गेलेल्या 'सैनिकाला' उद्देशून वापरण्यात आला आहे. तो कोणत्याही एका विशिष्ट जाती किंवा धर्माचा नाही. या शिपायाला कोणीही अडवू शकत नाही. अशी त्याची दृढ श्रद्धा आहे. या कडव्यातून विश्वबंधुत्वाचा विचार स्पष्ट केला आहे. येथे 'न 'मी' एक पंथाचा' असे हा सैनिक स्वत:ला म्हणवत आहे. येथे त्याचा 'मी' चा अर्थ संकुचित नाही. संपूर्ण विश्व हे त्याचे कुटुंब असून डोक्यावर सर्वांच्या एकच आकाश आहे आणि पायाखाली एकच पृथ्वी आहे. त्यामुळे येथील सर्वच माणसे माझी भावंडे आहेत. ही सर्व माणसे माझी आहेत, मी त्यांचा आहे. लहान, मोठे, साधू-अधम हा भेद तो कसलाच नाही तो स्वत:चीच पूजा करताना आपल्याला दिसतो. म्हणजेच त्याला त्याच्या स्वत्वाची जाणीव आहे, असे कवी म्हणतो. मुळात सर्वच मानवसृष्टी ही समान आहे, तरीही त्यांच्यात भेद पडलेले दिसतात. या लोकांच्यामध्ये कलह होताना दिसतो. हा कलह बघून कवीचे मन नाराज होते. हा कलह कसा मिटेल याची त्याला एकच चिंता आहे. विश्वात शांतीचे साम्राज्य निर्माण व्हावे, असे कवीला वाटते आणि त्याचा प्रेषित हा नव्या दमाचा शूर शिपाई आहे.

कवितेच्या सुरुवातीला 'कोण मला वठणीवर आणू शकतो ते मी पाहे' हा आवेश पुढे कमी होत गेलेला आहे. कवी मानवी जीवनास हलव्याची उपमा देतो. मूळ मानव हा तिळाप्रमाणे सर्वत्र सारखाच असतो. माणसामधील 'मी'पणा सर्वत्र समान असतो. परंतु हलव्यात तिळावर साखरेचा पाक आपण चढवतो त्याप्रमाणेच प्रत्येक मानवावर त्या त्या धर्माचे, संस्कृतीचे संस्कार होत असतात, करण्यात येतात. मानवाला सुसंस्कृत करण्याचे हे प्रयत्न चांगल्याच हेतूने केले जातात, पण हलव्याच्या प्रत्येक दाण्यावर बोचणारे काटे उभे राहतात. त्याचप्रमाणे इतर धर्मियांना बोचणारे असे मनोधर्म प्रत्येक माणसाच्या ठिकाणी सर्वत्र निर्माण होतात. त्यामुळे सर्वत्र कलह माजतो, असे कवी याठिकाणी म्हणतो. या कवितेत रूपकाच्या माध्यमातून कवीने माणसावर धार्मिक संस्कार झाले की त्याचे स्वरूप कसे बदलले हे सांगितले आहे.

**कविता आणि सामाजिक बांधिलकी :**

''केशवसुतांच्या काळात 'सामाजिक बांधिलकी' ही संकल्पना प्रचलित नव्हती, परंतु त्यांना परिवर्तनाची जाणीव होती.

'जुने जाऊ द्या मरणालागुनि।
जाळुनि किंवा पुरुनी टाका।'

हे आवाहन लाक्षणिक अर्थाने परिवर्तनवादीच होते, पण हे प्रत्यक्षात आणण्यासाठी आत्मविश्वास आणि आत्मबल कवीच देऊ शकतो. म्हणून केशवसुत म्हणू शकले,

'पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करी
विधीने दिली असे
टेकवुनि ती जनता शीर्षावर जग उलथून,
या देऊ कसे।
बंडाचा झेंडा उभवुनि धामधूम
जिकडे तिकडे
अडवुनि देऊनि जुलुमाने या करू पहा
तुकडे तुकडे।

असे बंड अन् बंडाद्वारे क्रांती हे तर परिवर्तनाचे अखेरचे अटळ पर्यायी रूपच असते; परंतु परिवर्तन आणि क्रांती म्हणजे नुसता विध्वंस आहे; तर सामाजिक वास्तवातील स्थितीगतीच्या आंतर्विरोधातून जी मानवी मूल्ये झालेली असतात, त्या मूल्यांची पुन:स्थापनाही निकडीची असते. म्हणून केशवसुत 'नवा शिपाया'च्या माध्यमातून समता, बंधुता या मानवी मूल्यांचा संदेश देत होते.

''साहित्याच्या सामाजिक बांधिलकीत निकड ही समाजपरिवर्तनासाठी असते. साहित्याचे हे सामाजिक कार्यच (Social Function) असते, याचे भान केशवसुतांना होते.'' (कऱ्हाडे सदा : ३१२)

### १.३.३ तुतारी :

केशवुतांच्या कवितांचा एक संप्रदायच स्थापन झाला. 'तुतारी' या कवितेपासून याची सुरवात झाली. या कवितेच्या त्यागाचे व अंतरंगाचे अनुकरण अनेक कवींनी केले. तिच्या नावाने एक मंडळ स्थापले गेले. एक काव्यसंग्रह या निमित्ताने निर्माण झाला. 'तुतारीचे पडसाद' सारखे स्वतंत्र ग्रंथ लिहिले गेले.

केशवसुतांच्या सर्व कवितांमध्ये ही कविता अधिक प्रसिद्ध झाली. सुधारणेचा उपदेश या कवितेतून प्रभावीपणे मांडला गेला. कविजनांनी पुकारलेले सुधारणेचे हे पहिले बंड होते. अत्यंत आक्रमक वृत्तीने त्यांनी या कवितेतून समाजातील अन्याय, अत्याचार, सर्व प्रकारची विषमता नष्ट व्हावी आणि तळागाळातल्या माणसाला न्याय मिळावा, त्याला सुखा-समाधानाने जगता यावे अशी समाजरचना असावी, ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. समाजातील रूढी-परंपरेवर हल्ला करण्यासाठी 'तुतारी' कवितेतून बंडाचे निशाण त्यांनी उभे केले. नवीन विषयाचे प्रतिपादन करण्याकरीता त्यांनी नवीन पद्ययोजना केली. या पद्याच्या एकेका खंडात पाच-पाच चरण आहेत. त्यापैकी पहिल्या व पाचव्या चरणांचे एक व मधल्या चरणाचे एक, अशी यमकरचना केली. पहिल्या चरणात वाक्यार्थाचा विन्यास, मधल्या तीन चरणात त्याचा विस्तार व पाचव्या चरणात त्याचा समारोप अशी अर्थदृष्ट्या स्थूल रचना असते. हाच पद्यप्रकार 'सुधारक' काव्यात माधव ज्यूलियन यांनी अवलंबला होता.

या कवितेत केशवसुत 'तुतारी' हे वाद्यच आणून द्या असे म्हणतात, कारण लोकांना जागे करायचे तर

एखादे कर्कश वाद्यच जवळ हवे; म्हणून इतर वाद्ये न घेता केवळ ते 'तुतारीचा' आग्रह धरतात. सारंगी, सतार, वीणा, मृदंग याचे सूर या ठिकाणी काहीच उपयोगाचे नाहीत. पहिल्या तीन कडव्यानंतर कवी मूळ विषयाकडे येतो. रूढींनी येथील समाजाला कीड लागली आहे. जुन्या रुढी, परंपरा यांचा त्याग करा. नवीन काहीतरी करा. पुराणातील चमत्कारांना विसरा असे आवाहन ते करीत आहेत. येथील संघशक्ती नष्ट झाली आहे. पूर्वजांनी केलेल्या पापाचे प्रायश्चित्त घेण्यास तुमचे रक्त हवे आहे. धर्म व नीती यात धर्म हा नीतीवर अधिष्ठित असतो. येथे अनितीला दूर सारायला हवे. सर्व नियम माणसाकरीता असतात त्याचे पालन करायला हवे. माणूस नियमांकरीता नसतो. जे नियम माणसाच्या प्रगतीला विरोध करतात ते धुडकाऊन लावले पाहिजेत, झुगारून दिले पाहिजेत. लोकांनी समतेचा ध्वज उंच धरावा, देव-दैत्यांच्या सतत चाललेल्या युद्धात देवांना साह्य करा. देवांना साह्य करा म्हणजेच चांगल्याची बाजू घ्या. असे अनेक विचार कवी या कवितेच्या माध्यमातून मांडत आहे.

हातात बंडाचे निशाण घेऊन ते समाज बांधवांना पुन:पुन्हा पाचारण करीत आहेत. त्यांनाही नवी जागृती, नवी जाणीव सर्वांमध्ये पसरवावयची आहे. जुने जग उलथून टाकून त्या जागी एका नव्या स्वर्गीय जगाची स्थापना करायची आहे. केशवसुतांच्या काळात सारे राष्ट्र पारतंत्र्याच्या पाशांनी करकचून आवळले गेले होते. सभोवतालची समाजस्थिती व्यक्तित्त्वाचा सर्व बाजूंनी कोंडमारा करणारी होती. या साऱ्याची तीव्र प्रतिक्रिया या कवितेतून येते. व्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्व दिल्याशिवाय, समाजाची सर्वांगीण प्रगती झाल्याशिवाय आपला देश पुढे जाणार नाही याची खात्री त्यांना होती. त्या काळात राजकीय पारतंत्र्यातून प्रत्येकाला सुटका हवी होती पण सामाजिक सुधारणेबाबत मात्र समाजातील लोकांमध्ये तीव्र स्वरूपाचे मतभेद होते. समाजात आमूलाग्र क्रांती करू पाहणारे नवे तत्त्वज्ञान येथील समाजाला सहजासहजी झेपणारे नव्हते. त्यामुळे समाजात सनातनी व सुधारक असे दोन पक्ष निर्माण होऊन हे एकमेकांशी आरोप-प्रत्यारोपाच्या फेरीत व्यग्र होते.

सामाजिक अन्यायाची चीड केशवसुतांइतकी उद्रेकी स्वरूपात अन्य कोणी गद्य वा पद्य लेखकाने क्वचित मांडली असेल, हे गो. म. कुलकर्णी यांचे भाष्य खरेच आहे. (कुलकर्णी गो. म. : ३).

**''हल्ला करण्या तर दंभावर – तर बंडावर,**
**शूरांनो! या, त्वरा करा रे!**
**समतेचा ध्वज उंच धरा रे!**
**नीतीची द्वाही पसरा रे!**
**तुतारिच्या या सुराबरोबर!''**

'तुतारी' कवितेतील उद्‌गार, समतेचा ध्वज उंच धरण्याविषयी माणसाला आवाहन करतात. यामध्ये कवी वेगवेगळे विचार एकत्र मांडताना दिसतो. निसर्गाबरोबर झगडण्याच्या कल्पनेकडून संघशक्तीच्या विचारांकडे जाताना 'मऊ मेंढरे बनू नका' हा बोधविचार ते देतात. 'नियमन हे मानवासाठी, मानव नियमनासाठी नाही' हा विचारही कवी मांडतो. तसेच विषमतेविरुद्ध बंड व समतेची दृष्टी, कर्मठ धर्मापेक्षा मानवाच्या परस्परसंबंधावर आधारलेली नीती योग्य असल्याची घोषणा, हा विचारही केशवसुत करतात. नियमांचे गुलाम न बनता, प्रचलित

अनिष्ट रुढींचे दास्यत्व झुगारून द्या आणि स्वसामर्थ्यावर काहीतरी कर्तृत्त्व करा, असे विविध उपदेश केशवसुतांनी 'तुतारी' या कवितेतून केले आहेत.

या कवितेच्या प्रभावातून प्रेरणा मिळून बालकवींची 'धर्मवीर', गोविंदाग्रजांची 'दरारा', टिळकांची 'रणशिंग', कवी बींची 'डंका' यासारख्या कवितांची निर्मिती झाली. 'तुतारी'च्या जोडीला 'नवा शिपाई', 'स्फूर्ति'सारख्या कविता निर्माण झाल्या.

### १.३.४ मजुरावर उपासमारीची वेळ :

केशवसुतांची ही कविता सामाजिक जाणिव तर व्यक्त करतेच पण त्यासोबत आर्थिक विषमतेवर आधारीत जाणिवा यातून व्यक्त होतात. कवितेतील मजूर आपल्यावर अवलंबून असणाऱ्या मुलांची उपासमार होते म्हणून दु:खी आहे. दिवसभरात त्याला काहीच काम न मिळाल्यामुळे मजुरीही मिळाली नाही. त्यामुळे आपल्यावर अवलंबून असलेल्या मुलांची उपासमार होते हे बघून त्याचे ह्रदय पिळवटून निघते. आपल्या आणि आपल्या वाडवडिलांच्या श्रमावर बांधल्या गेलेल्या उच्च उंच मंदिरात नाचणाऱ्या श्रीमंताच्या बद्दलचा विचार त्याच्या मनात येत आहे. या श्रीमंताबद्दल मजुराला हेवा वाटत नाही. कष्टात मरायला तो तयार आहे. पण भुकेने मारू नको अशी विनवणी तो देवाला करतो आहे. देव सगळ्यांना सारखेच बघतो. त्याला सर्वजण समान आहेत असेही तो म्हणतो.

पण एका विशिष्ट वर्गाला सुग्रास आणि चांगले अन्न तू दिले आहेस आणि आम्हाला साधी भाकरीसुद्धा मिळत नाही याची खंत हा मजूर व्यक्त करतो आहे. आज पक्षी सुद्धा आपल्या पिलांसाठी चारा घेऊन चालले आहेत. हे पक्षी किती सुखी आहेत तसा मी सुद्धा तुमच्याकडे लवकर येतो असे तो मजूर म्हणत आहे, पण जर मुलांना काही खायला नाही मिळाले तर त्यांना कसे तोंड दाखवावे असे ते म्हणतो. मुलांना काही खायला न नेता जाण्यापेक्षा मरणच आलेले बरे असे मो म्हणतो.

### १.३.५ गोफण केली छान :

'गोफण केली छान' ही केशवसुतांची कविता समाजातील अनिष्ट प्रवृत्तींशी कठीण शब्दांच्या धोंड्यांनी हाणामारी केली पाहिजे, हे सांगणारी आहे. काहीशा रूपकात्मक पद्धतीने या कवितेचा आशय मांडलेला आहे. ह्रदय पिळवटून काढलेले हे उद्‌गार त्वेषाने बाहेर पडतात व जुन्या रूढीपूजकांशी वैराची जाहीर घोषणा करतात. त्वेषाच्या दोराला त्यांनी ह्रदय पीळ भरला आहे. आळशीपणाने बसणारे, नुसतीच पोकळ तोऱ्यात बडबड करणारे, कोणतीच कृती न करणारे, दुष्ट-शत्रूशी वैर विसरून त्यांच्याशी भांडण्याऐवजी त्यांनी दिलेल्या तूप-पोळीत कृतार्थता मानणारे, आपल्या पूर्वजांचा बडिवार माजवून आपले अर्कतृत्त्व सिद्ध करणारे, थप्पड मिळाली असता उलट प्रतिक्रिया न देता नुसते गाल चोळीत बसणारे व लहान मुलांनाही गरिबी शिकवून त्यांची दिशाभूल करणारे हे केशवसुतांच्या वैराचा विषय झाले आहेत.

कवी वैराची गाठ मारून गोफण छान बनवतो आणि या गोफणीत कठीण शब्दांचा धोंडा घालून ती फिरवतो. कवी गोफण आणि त्यातील धोंडा याचे रूपक घेऊन अनिष्ट प्रवृत्ती नष्ट करण्याचे सूतोवाच करीत आहे.

## १.३ सारांश :

केशवसुतांच्या या पाचही कवितांमधून सामाजिक दृष्टिकोण प्रकट झाला आहे. देव, देश, धर्म, समाज इत्यादींचा केशवसुतांच्या कवितेत आलेला विचार हा आदर्श ध्येयस्वप्नांच्या अनुषंगाने आलेला आहे. तुतारी, नवा शिपाई सारख्या या कविता क्रांतिकारक आणि सामाजिक आशयाने भरलेल्या आहेत. मराठी कवितेचा नवा चेहरा व त्याचे नवे भान देण्याचे काम केशवसुतांच्या कवितेने केले.

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

१. मनुज - माणूस

२. नीलाम्बर - निळे आकाश

३. अंत्यज - अस्पृश्य

४. तेधवा - तेंव्हा, त्यावेळी

## १.४ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे :

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) अंत्यजाचा मुलगा आपल्या आईला काय प्रश्न विचारतो?

२) अंत्यजाची मुले खेळत असताना त्यांना वाटेतून दूर व्हायला कोणी सांगितले?

३) अस्पृश्याच्या मुलाला आई कशा प्रकारे समजावते?

४) 'नवा शिपाई' या कवितेतील शिपाई कोणत्या पंथाचा आहे?

५) कवीला जिकडे जावे तिकडे काय दिसते?

६) पक्ष्यांकडे बघून मजुराला काय प्रश्न पडतो?

७) कवीने कशाची गोफण केली आहे?

**उत्तरे :**

१) अंत्यजाचा (अस्पृश्याचा) मुलगा आपल्या आईला 'आपली सावली पडल्याने अशी काय बाधा होणार आहे?' असा प्रश्न विचारते.

२) अंत्यजाची (अस्पृश्याची) मुले खेळत असताना त्यांना एक ब्राह्मण वाटेतून दूर व्हायला सांगतो.

३) 'आम्ही नीच बा आणि ते लोक थोर तया पाहता होईजे नित्य दूर' असे उत्तर त्याची आई दिते.

४) 'नवा शिपाई' या कवितेतील शिपाई कोणत्याही जाती-धर्म पंथाचा नाही.

५) कवीला जिकडे जावे तिकडे त्याचीच भावंडे दिसत आहेत.

६) निसर्गातील पक्षीही आपल्या पिलांना चारा घेऊन घरट्यात परततो. मग उपासपोटी असलेल्या माझ्या मुलांना माझी कारभारीण कशी समजावत असेल असा प्रश्न पडतो.

७) कवीने हृदयाची आतडी फाडून त्याचा दोर वळला आहे आणि त्या दोराला त्वेषाचा पीळ दिला आहे.

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) विश्वबंधुत्वाची भावना केशवसुत आपल्या कवितेतून कशा प्रकारे व्यक्त करतात?

२) 'तुतारी' या कवितेतून कवी बंडाचे निशाण का उभे करीत आहे?

३) कष्ट करण्याची तयारी असलेला मजूर दु:खी का झाला आहे?

४) 'गोफण केली छान' या कवितेतील विद्रोहाचे स्वरूप स्पष्ट करा.

५) 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' या कवितेतील सामाजिक जाणीव स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१. 'केशवसुतांच्या निवडक कविता' - 'हरपले श्रेय' (संपा. रा. श्री. जोग), कौन्टिन्टेन्टल प्रकाशन, पुणे, ३० (प्र. आ. १९५६)

२. त्रिदल, (बालकवी, कुसुमाग्रज आणि इंदिरा संत यांच्या निवडक कविता) संपा. डॉ. दत्तात्रय पुंडे, डॉ. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे (एप्रिल १९९३).

३. आधुनिक मराठी कवितेतील राष्ट्रीय भावना (सन १८५०-१९५०), डॉ. सुधाकर कलवडे, मधुश्री प्रकाशन (प्रथमावृती २०११).

४. 'झपूर्झा', गो. म. कुलकर्णी, वि. म. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (जानेवारी १९९६)

५. प्राचार्य राम शेवाळकर : गौरव ग्रंथ, ''मराठी कविता : परंपरा आणि दर्शन'', संपा. डॉ. रवींद्र शोभणे) विजय प्रकाशन, नागपूर, (प्र.आ. १ मार्च, २००६)

❑❑❑

## २)    वसंत बापट यांची कविता :

अनुक्रमणिका

२.०    उद्दिष्ट्ये

२.१    प्रस्तावना

२.२    लेखक परिचय

२.३.    विषय विवेचन

    २.३.१    फुंकर

    २.३.२    जपावयाला शिकली होतीस

    २.३.३    आज अचानक

    २.३.४    नाजुक रुपडे

    २.३.५    विस्मृती

२.४    सारांश

२.५    पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.६    स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

२.७    सरावासाठी स्वाध्याय

२.८    अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्ट्ये :

वसंत बापट यांच्या फुंकर, जपावयाला शिकली होतीस, आज अचानक, नाजुक रुपडे, विस्मृती या कविता अभ्यासल्यानंतर आपणास,

- वसंत बापट यांच्या कवितांचे आकलन होईल.
- वसंत बापट यांच्या कवितेतून येणाऱ्या प्रेमजाणिवा लक्षात येईल.

## २.१ प्रास्ताविक :

वसंत बापट हे मर्ढेकरोत्तर कवींच्या पिढीतील महत्त्वाचे कवी. बालपणापासून राष्ट्रसेवा दलाचे संस्कार आणि साने गुरुजींचा सहवास यातून कवी वसंत बापट यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत गेली. ध्येयवादी शैक्षणिक वातावरण आणि १९४२ चे रोमहर्षक वातावरण मोठमोठ्या माणसांचा भोवताली असलेला वावर आणि समाजासाठी तळमळणारे मन यातून बापट यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली. ते राष्ट्रसेवादलामध्ये दीर्घकाळ कार्यकर्ते म्हणून वावरले. साने गुरुजी, सेनापती बापट, अच्युतराव पटवर्धन, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे अशांच्या सहवासात ते राहिले. बापटांच्या सुरुवातीच्या कविता लेखनाच्या काळात सामाजिक, राष्ट्रीय जाणीवा हेच त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे केंद्र दिसते. त्यांच्या 'बिजली' या काव्यसंग्रहातील कवितांचे सामाजिक, राष्ट्रीय जाणीव हे महत्त्वाचे केंद्र आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील ४२ च्या चळवळीत भूमिगत होण्यापासून स्वतंत्र नभोवाणी केंद्र चालवण्याचा केलेला उपक्रम, राष्ट्रसेवा दलाच्या कलापथकाचे अध्वर्यू, स्वातंत्र्योत्तर कालखंडात समाजवादी चळवळीत सहभाग, गोवा मुक्तिआंदोलनात क्रियाशील, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहकार्य, भूदान यज्ञाच्या जागृतीचे कार्य अशा अनेक स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर राजकीय व सामाजिक चळवळीत प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या या कवीची ही कविता आहे.

बापटांच्या कवितेच्या केंद्रस्थानी सामाजिक आणि सौंदर्यवादी अशा दोन प्रेरणा प्रभावी ठरतात. बापट म्हणतात, ''मी ज्या तऱ्हेने जगलो ती तऱ्हा पाहिली तर असं लक्षात येईल की, सामाजिक जाणिवेचं लेखन मी स्वाभाविकपणे केलेलं आहे. सेवादल आणि समाजवादी आंदोलन ही माझ्या दृष्टीनं माझ्या बहिर्मुखतेची लक्षणं नाहीत. कारण या गोष्टी मी माझ्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग समजतो. याच्याही मागचं सूत्र शोधता येईल. मी अंतर्यामी सौंदर्यप्रेमी आहे. त्यामुळे मानव समाजाचं जीवन कुरुप, ओंगळ, अभद्र नसावं असं मला वाटतं. तुम्ही रोमँटिक म्हणा किंवा काही म्हणा जे जग आहे ते ते त्यापेक्षा सुंदर असावं असं वाटणं आणि त्यामुळे जीवनातलं उणेपण जिवाला लाऊन घेणं, असं घडलं की माणूस समाजवादी विचाराकडे वळतो. एकीकडे सौंदर्य आणि जीवनविषयक उल्हास आणि दुसरीकडे हृदयाला स्पर्श करणाऱ्या भावना या दोन्ही गोष्टी साहित्याच्या निर्मितीला प्राणभूत आहेत. एकलक्षी कवींना यातील एकदोन गोष्टींचच आवाहन असते. तर बहुलक्षी कवींना अनेक गोष्टींचं आकर्षण वाटतं. त्यामुळे माझ्या म्यानात पोवाडा आणि लावणी दोन्ही सुखानं नांदतात. सौंदर्य, प्रेम अशा साहित्यातील चिरंतन प्रेम मी मोलाचे मानतोच, पण भोवतालच्या स्फोटक परिस्थितीमुळे झालेला उद्रेक देखील मी तितकाच प्रेरक मानतो.'' (वसंत बापट : ३६)

वसंत बापट यांच्या कवितेत सामाजिक प्रेरणा ज्या पद्धतीने येतात त्याप्रमाणे सौंदर्यवादी प्रेरणांचे प्राबल्य त्यांच्या कवितेतून दिसून येते. कुसुमाग्रजांच्या जाणिवांशी संवादी अशी कविता 'बिजली' या काव्यसंग्रहात दिसून येते. सभोवतालचा काळ, त्या त्या काळाचा कवीच्या प्रतिभाशक्तीवर झालेला परिणाम त्यामुळे निर्माण झालेला ताण 'बिजली' या संग्रहातील कवितांवर दिसतो. बिजलीनंतर कुसुमाग्रजांच्या 'विशाखा'शी असलेले बापटांचे नाते अत्यंत अल्प स्वरूपाचे असलेले दिसते. राष्ट्र आणि समाज या जाणिवांच्या प्रभावानंतर बापटांच्या कवितेत केंद्रवर्ती स्थान मिळाले ते प्रेमजाणिवेला. 'बिजली' या संग्रहातील आठएक कविता सोडल्या तर बाकीच्या सर्व कविता सामाजिक व राष्ट्रीय जाणिवेच्या आहेत. 'सेतू'च्या संग्रहातील ५१ कवितांपैकी ३० कविता या प्रेमजाणिवा व्यक्त करणाऱ्या आहेत. पुढे 'अकरावी दिशा' व 'सकिना' मध्ये नव्या नव्या अनुभूती प्रकट करणाऱ्या कवितांची संख्या अधिक आहे. 'मानसी' या संग्रहातील कवितेत कवीने प्रेमाच्या विविध छटा रंगवल्या आहेत.

## २.३ विषय विवेचन :

बापटांच्या कवितेमागील प्रेरणा प्रथमत: बहुजनहितााय, लोककल्याणमय अशा भूमिकेतून आल्याची व त्यानंतर प्रेमजाणिवेकडे बदलत गेलेल्या दिसतात. या प्रेमकवितांमध्ये आपल्याला विविध वळणे लक्षात येतात. मूलत: आत्माविष्कारात्मक प्रेरणा असलेली पण नाट्यात्मकतेने प्रगट झालेली, सौंदर्यवादी वृत्तीतून भावकाव्यात्मक रूप असलेली आणि विविध भूमिकेतील प्रेरणेने नाट्य प्रगट करणारी अशी ही विविध रूपे आहेत.

१९५२ मध्ये प्रकाशित झालेल्या 'बिजली' या काव्यसंग्रहातून देशभक्ती, स्वातंत्र्याची चळवळ, तरुणांना चेतविणारे, तरुणांना प्रेरणा देणारे काव्य रसिकांपुढे आले आहे. कवीला अपेक्षित असे क्रांतीचे प्रतिक म्हणजे बिजली. अंधारातून प्रकाशाकडे नेणारा दिवा म्हणजे बिजली. क्रांतिविषयक अनेक कविता या संग्रहात असल्याने या संग्रहाचे नाव 'बिजली' असे वसंत बापटांनी योजले. 'बिजली' नंतर 'सेतू' (१९५७) काव्यसंग्रह प्रकाशित झाला. 'सेतू'मध्ये मुग्ध व नर्म शृंगाराची, प्रेमाच्या सफलतेची, विफलतेची मुख्य गीते आहेत. प्रेमी जीवनाचे विविध रंग, निसर्गाची नाना रूपे आविष्कृत झाली आहेत. 'अकरावी दिशा' (१९६२) आणि सकीना (१९७२) या काव्यसंग्रहात वसंत बापटांची कविता विकसित आणि स्थिर झाल्याचा प्रत्यय येतो. यातून त्यांनी लिहिलेल्या लावण्यातून पुरुषी दृष्टीने व्यक्त होणारी स्त्री सौंदर्याची अभिलाषा हाच त्यांच्या लावणीचा मुख्य सूर आहे. निसर्गचित्रण आणि जीवनचिंतन एकमेकात मिसळून गेल्याचा अनुभव त्यांच्या कवितेत येतो.

त्यांच्या 'जपावयला शिकली होतीस,' 'फुंकर' या प्रेमकवितांची निर्मिती मूलत: सौंदर्यवादी भावकाव्यात्मक प्रेरणेतून झाली आहे. प्रेमाचे कितीतरी अनोखे रंग त्यांच्या कवितेतून अनुभवास येतात. अनुभव नाट्यात्म पद्धतीने मांडण्याची पद्धत, खटकेबाज रचना, चमत्कृतिपूर्ण कलाटणी यातून त्यांच्या नाट्यगीतांची निर्मिती होते.

१९७७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'मानसी' या कवितेत छत्तीस कवितांची एक मालिका कविता आहे. हा एक स्वतंत्र काव्यप्रकार असून कवीचे व्यक्तिमत्त्व व त्याच्या भावना याना केंद्रस्थानी मानणारा हा एक दीर्घ भावकवितेसारखा नवा प्रकार त्यांनी रूढ केला. १९८२ मध्ये प्रकाशित झालेल्या 'प्रवासाच्या कविता' हे एक

प्रवासपद्य आहे. अमेरिकेचे धावते दर्शन खोचक भाषेद्वारे त्यांनी यातून घडविले आहे. 'शिंग फुंकले रणी' (१९८२) या संग्रहातून त्यांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात लिहिलेली देशभक्तिपर गीते आहेत. बेचाळीसची चळवळ, स्वातंत्र्यप्राप्ती, गोवा मुक्ती आंदोलन अशा क्रमाने घडत गेलेल्या स्थित्यंतराचे दर्शन या गीतसंग्रहातून घडते. १९८८ साली प्रकाशित झालेल्या 'शूर मर्दाचा पोवाडा' या संग्रहात १९४२ पासून वेळोवेळी जे पोवाडे रचले त्याचे एकत्रिकरण केले आहे. 'मेघहृदय' हा १९८८ मध्ये प्रकाशित झालेला कवि कुलगुरू कालिदासाच्या 'मेघदूता'चा भावानुभाव आहे.

वसंत बापटांचे व्यक्तिमत्त्व सौंदर्यवादी आहे. विविध प्रकारचे सौंदर्यानुभव विविध अंगांनी त्यांच्या कवितेतून आविष्कृत झालेले आहेत. स्फूर्तीगीते, समरगीते, भावगीते, पोवाडे, लावणी, प्रेमगीते अशा विविध अंगांनी त्यांचा काव्यप्रवास फुलला आहे.

वसंत बापटांच्या फुंकर, जपावयाला शिकली होतीस, आज अचानक, नाजुक रुपडे आणि विस्मृती या कवितांचा अभ्यास प्रस्तुत अभ्यासपत्रिकेत करण्यात आला आहे. प्रेमभाव हा या पाचही कवितांच्या केंद्रस्थानी आहे. प्रेमाची विविध रुपे या कवितांमधून अनुभवास येतात.

**फुंकर :**

'फुंकर' या कवितेत 'तो' आणि 'ती' च्या नात्यातील भूतकाल, वर्तमान भेटीच्या एका क्षणात नायकाच्या मनात एकेका संदर्भाने आंदोलित होत राहतो. पूर्वाश्रमीचा प्रियकर मधली काही वर्षे उलटून गेल्यावर काही निमित्ताने अचानक विवाहित प्रेयसीच्या घरी जातो. संसारात रमलेली त्याची प्रेयसी 'जसे काही पूर्वी काही घडलेच नाही' अशा प्रकारे त्याच्याशी वागते. तेव्हा प्रियकराच्या मनात येणाऱ्या भावना बापटांनी येथे शब्दबद्ध केल्या आहेत. हा एकप्रकारचा मूळसंवादच आहे. नायकाचे मन थाऱ्यावर नाही. त्याचे मन पूर्वीच्या आठवणींनी दाटून आले आहे. पूर्वी घडून गेलेल्या आठवणी आणि आता प्रत्यक्ष त्या आठवत असताना त्या दोघांमध्ये निर्माण होणारा ताण याचे उत्कट दर्शन या कवितेत होते. प्रेमवंचनेचा मूळ धागा या कवितेत दिसून येतो. भूतकालीन स्मृतींमध्ये अडकल्यामुळे एकप्रकारचे नाट्य या कवितेमध्ये निर्माण झाले आहे.

**''या जाळीच्या पडद्यात**
**कशाला कोरले आहेस**
**हे हृदय, उलटे उत्तान?...**
**काचेच्या कपाटात**
**कशाला ठेवल्या आहेस**
**भुश्शाच्या राघूमैना?...**
**उडताहेत लाकडी फळांवर**
**कचकड्यांची फुलपाखरे**
**भिंतीवर रविवर्म्याची पौष्टिक चित्रे हारीने.''**

कवीला जाळीच्या पडद्यात कोरलेले, विणकाम केलेले हृदय उलटे आणि उत्तान वाटते. काचेच्या कपाटात ठेवलेल्या भुश्श्याच्या राघू-मैना व्यर्थ वाटत आहेत. लाकडी फळांवर कचकड्यांची फुलपाखरे उडताहेत असे वाटते. काळ्या मखमलीवर पतीच्या नावाचा प्रेयसीने काढलेला रेखीव कशिदा त्याला मनातून त्रासदायक वाटतो. त्यातला एखादा चुकलेला टाकासुद्धा त्याच्या मनाला समाधान देणारा आहे; पण ती चुकलेली नाही.

प्रेयसीने सहजपणे 'काय घेणार?' हा विचारलेला प्रश्न प्रियकराच्या मनात अनेक आंदोलने निर्माण करतो. प्रियकराला पूर्वी प्रेयसीसोबत घेतलेल्या आणाभाका, त्या शपथा, एकमेकांनी वाटून घेतलेले चिंचेचे आकडे परत मागायची इच्छा होत आहे, पण या भावनांना मागे सारत तो कसलेही साखरपाणी देण्याविषयी प्रेयसीला सुचवत आहे.

भिंतीवरचे प्रेयसीचे आणि तिच्या पतीचे छायाचित्र पाहून त्याच्या मनात किंचीतशी रागाची छटा निर्माण होते. पतीसोबतच्या छायाचित्रात ती पूर्वी आपल्या सोबत काहीच झाले नाही अशी दिसते आहे. तिच्या पतीच्या डोळ्यातील कर्तेपणाची झाक पाहून त्याला राग येत नाही, प्रियकराची द्विधा मन:स्थिती यातून दिसून येते. आपल्या रागावर काबू ठेवत तो प्रेयसीला एखादे टोचणारे वाक्य बोलण्याचे ठरवतो, पण तेही त्याला जमत नाही याचे कारण हसणाऱ्या प्रेयसीला पाहून त्याला तिला दुखवावेसे वाटत नाही. कवितेच्या शेवटच्या ओळीतून विरोधाभास निर्माण करून कवी नाट्य निर्माण करतो.

''पण नकोच सांगूस
तेवढीच माझ्या मनावर
एक फुंकर.''

प्रेयसीच्या मनातील भाव काय आहेत ते तिच्याकडून जाणून घ्यावेसे त्याला वाटते पण ते कळून घेण्यासही एक अनामिक भिती त्याला वाटते आणि तिच्या मनाचे भाव जाणून न घेण्यातच त्याला आनंद वाटतो. आपल्याप्रती प्रेयसीच्या मनात अजूनही काही भावना आहेत, असे वाटून तो स्वत:च्या मनावर फुंकर घालून घेतो.

**जपावयाला शिकली होतिस :**

विवाहित स्त्री व तिचा पूर्वाश्रमीचा प्रियकर यांच्या भेटीचे पूर्ण चित्रण 'जपावयाला शिकली होतिस' या कवितेत आलेले आहे.

वसंत बापटांच्या कवितेतून येणारा प्रियकर हा प्रामुख्याने त्याची जिंदगी प्रीतीमुळे बरबाद झालेला, विव्हळ झालेला, त्या स्मृती-तरंगातच रंगणारा आहे. नाट्यपूर्ण अशा पद्धतीने या प्रियकराने आपली प्रेमभावना व्यक्त केली आहे. पौगंडावस्थेतल्या प्रेमाची उत्कट अनुभूती देणारी ही कविता गतकाळातल्या प्रेमाच्या आठवणींचे पदर उलगडणारी आहे. नुकतेच शैशव संपलेले आहे. प्रेयसीबद्दलच्या सर्व आठवणी आज बऱ्याच वर्षांनी कवीला आठवत आहेत आणि या आठवणी आठवल्यावर आपण स्वत:चे राहत नसल्याची कबुली कवी देतो. या वयात परस्परांना वाटणारे एकमेकांचे आकर्षण, प्रेयसीच्या वागण्यातल्या खट्याळपणाचे आकर्षण, प्रेयसीच्या वागण्यातल्या खट्याळपणाचे दर्शन बापट या कवितेतून घडवतात. प्रियकराला प्रेयसीबद्दलचे आकर्षण अनेक

प्रतिमांच्या माध्यमातून व्यक्त होते. प्रेयसीचे मन केळीवरच्या दवाप्रमाणे हळवे होते, असे कवी म्हणतो. प्रेयसीला प्रियकराच्या मनातील सर्व भावना कळत होत्या, पण प्रेयसी ते कळून न कळल्यासारखे करायची. हे प्रियकराला आठवताच तो स्वत:चा राहत नाही, तो स्वत:शीच हसतो.

प्रेयसीला आपल्या मनातील प्रेमभावना कळाव्यात असे या कवितेतील प्रियकराला वाटत राहते.

**नाजुक रुपडे :**

'नाजुक रुपडे' ही लावणी वसंत बापटांच्या एकूण सर्व लावण्यांचा अर्क आहे असे म्हणावे लागेल. लावणीच्या शीर्षकात आणि कवितेतील शब्दांशब्दात उमलत्या यौवनाच्या शेडचा त्यांनी निर्देश केला आहे.

> **''चोळी वरती सोळा ऐने, आठांना दुनिया दिसली**
> **नजर जराशी घुटमळली तो पदर चोंबडा करि चुगली''**

स्त्रीच्या रुपसौंदर्याचे, तिच्या यौवनाचे चित्र रेखाटताना शब्दांची नादमधुर रुपे संपूर्ण कवितेतून येत राहतात. वसंत बापटांच्या लावणीतील प्रेम शारीरिकच आहे. 'नाजुक रुपडे' या कवितेत कवीने शारीरिक सौंदर्याचे वर्णन मोठ्या प्रमाणात केले आहे. चोळीवरचे सोळा ऐने, चोंबडा पदर, ओठ टिपीचा रुमाल, शेलाटी कंबर, केतकी पोटऱ्या, झणत्कारणारी पावले इ. शब्दकळा मराठी लावणीची आठवण करून देते. खटकेबाज शब्दरचना आणि अनुप्रास हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे. लावण्यात शाहिरी बाजही कवीने ढंगदारपणे रंगवला आहे.

**विस्मृती :**

'विस्मृती' या कवितेत आपल्याला विसरलेल्या प्रेयसीला प्रेमिक पूर्वीच्या एका भेटीची, त्या वेळच्या तिच्या स्थितीची आणि वागणुकीची तिला आठवण करून देतो.

> **''माझा कोट तुझ्या खांद्यावर**
> **शाल तुझी अन माझ्या देही...''**

ही कलाटणी सूचक आणि मोहक अशा स्वरूपाची आहे. वसंत बापटांनी भावच्छटेप्रमाणे अभिव्यक्तीच्या पद्धतीतही विविधता आणली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खास वैशिष्ट्य असलेला मिस्किल, नर्मशृंगारिक रंगेलपणा या कवितेत फुलारून आला आहे. त्यांच्या नाट्यात्मक प्रतिभेचा पिंड त्याच्या लावणीवर कवितेतही कायम आहे.

वसंत बापटांनी प्रीतीच्या विविध छटा आपल्या प्रीतीकाळात रंगविल्या आहेत. आपली प्रीतीभावना व्यक्त करण्यासाठी त्यांनी निसर्गाची मदत घेतली आहे. भिजलेले रान, वादळी रात्र, मातट गंध, जास्वंदीची चुनडी, चंद्र, फुले, वाळ्याचे अत्तर, दव, थंडी, यासारख्या निसर्गप्रतिमांतून प्रीतीच्या अनुभूतीच्या नानाविध छटा, सौंदर्य, भावना आणि उत्कटता त्यांनी नजाकतीने सादर केल्या आहेत. प्रेमाच्या आविष्कृत होणाऱ्या रूपांमधून बापटांच्या रोमँटिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते.

प्रेयसीने बकुळफुलांचा गजरा माळला होता. वाळ्याचे अत्तर लावले होते, हे प्रियकराला आठवत आहे. प्रेमाच्या विविध तऱ्हा प्रकट करताना प्रियकर प्रेयसीला विविध प्रश्न विचारतो आहे. कवितेच्या आकाशात तिची उपस्थिती आहे. पण ती कुठेच बोलताना दिसत नाही. त्यामुळे भूतकाळात घडलेला प्रत्येक प्रसंग जिवंत वाटत आहे. 'तो' आणि 'ती' यांचे अस्तित्व अभिन्न आहे. हे परस्पराहून वेगळे नाहीत याचा प्रत्यय या कवितेतून येतो. या कवितेतून व्यक्त होणाऱ्या प्रेमभावनांच्या आविष्कारात कवी कोणताही आडपडदा ठेवत नाही.

**आज अचानक :**

'आज अचानक' ही कविता वसंत बापटांच्या इतर कवितांपेक्षा थोडीशी वेगळी आहे. शारीरिक आकर्षणातून त्या काळात प्रेयसीच्या अंगोपांगाचे दर्शन घडविणारी कविता मोठ्या प्रमाणावर लिहिली जात होती. बापटांच्याही अनेक कवितात शरीर वर्णनावर भर दिसतो. 'आज अचानक' हे एक नाट्यगीतच आहे. या नाट्यगीतात प्रेयसीचे भावणे अचानकपणे मनाला जागवून टाकते.

**''न तुझी चाल चंचल**
**न अवखळ अंचल**
**न तीळ कुठे गालावर**
**न कुरळे बंड भालावर''**

अशी साधीसुधी ती.

**''रोजरोज पहात होतो**
**शेजीबाईच्या अंगणामधील**
**प्राजक्ताची झाडं**
**आज माझ्या दारी त्यांचे सडे जसे पडले आहेत**
**इंद्राऐसे माझ्या अंगा हजार डोळे फुटले आहेत**
**दिसते आहे लपले घन**
**कळते आहे दुखरे मन**
**आज अगदी अचानक छंद माझा मुक्त झाला**
**आणि तुझ्या व्यक्तित्त्वाचा घोट घेऊन तृप्त झाला!''**

डोळसपणाने तिचे सौंदर्य जाणवते. उरात उर्मी, डोळ्यात जहर असलेल्या बाह्य सौंदर्यापेक्षा तिचे प्राजक्ती गुणवती सुगंधीपण त्याच्या मनात उमलते. या कवितेत दोन भिन्न भिन्न प्रेरणातून कवितेतील नाट्य तोलले जाते. 'तिचे सहज असणेपण' आणि 'तिचे' मनात अचानक प्रेमभावाने झणकारणे या त्या दोन भिन्न प्रेरणा आहेत. कवितेच्या सुरवातीस 'नव्हतो कधि लिहिणार, परंतू' अशी अनपेक्षित कलाटणीची अपेक्षा निर्माण केली जाते. परंतु त्याबरोबर हेही खरेच की ही कलाटणी वाचक श्रोत्याच्या मनात सुखद स्फूर्ती निर्माण करणारीही असते व ती शेवटी

तशीच राहते. म्हणजे 'अशी कविता लिहिण्यासारखी ती कोण नसता तिचे साधेपण मनाला कसे भिडते' हे स्पष्ट केले आहे.

## २.४ सारांश :

वसंत बापटांचा एकूण काव्यप्रवास दीर्घ स्वरूपाचा होता. आपल्या प्रकृतीधर्माला मानवतील तेवढे नवकवितेचे विशेष त्यांनी आत्मसात केले आणि सौंदर्यवादी कवितेची धारा अखंडपणे वाहती ठेऊन त्या धारेला सातत्य निर्माण करून दिले. यासोबतच त्यांच्या कवितेतून सामाजिक, राष्ट्रीय भान जोपासलेले दिसते. त्यांनी राष्ट्रीय आणि सामाजिक आशयाची कविता लिहिलीच त्यासोबतच सृष्टीतील विविध सौंदर्याचे तरल विभ्रमदेखील हळुवारपणे टिपले आहेत. स्फूर्तीगीते, समरगीते, भावगीते, नाट्यगीते, पोवाडे, लावणी, सांगितीका असा त्यांचा प्रवास आपल्याला दिसतो. कवितेत आविष्कारातील लयबद्ध गेयता, सौंदर्याचा आस्वाद घेण्याची रसिकवृत्ती, निसर्गाच्या भाववृत्ती, स्त्रीसौंदर्याची दिलखुलास अभिलाषा, प्रेमभावनेच्या विविध छटा, दिव्यतेचा ध्यास अशी विविधतापूर्ण वैशिष्ट्ये त्यांच्या कवितेतून येतात. अभिव्यक्तीची विविध रूपे त्यांनी यशस्वीपणे आपल्या कवितेतून हाताळली आहेत.

या ठिकाणी अभ्यासासाठी ज्या कविता आहेत त्या विवाहपूर्व प्रेमभावनेच्या आहेत. सफल प्रीतीचे प्रगटीकरण, असफल प्रीतीची खंत आणि वंचनेची व्यथा असे या कवितांचे स्वरूप आहे. यातील प्रेमभाव हा अवखळ, मीलनोत्सुक आणि रंगेल आहे, तसाच तो शापित, विरही आणि तळमळणारा आहे. या प्रेमकवितेतील प्रेयसी ही धीट आहे. पण इथे प्रियकरच बोलताना दिसतो. या कवितांमधून प्रियकराचा प्रेयसीशी नित्य संवाद चालू आहे. कधी कधी शारीरिकतेचे परिमाणही या कवितांना लाभले आहे. या कवितांमध्ये 'निसर्गवर्णनाच्या साहाय्याने भावना सूचित केल्या आहेत. कधी स्मरणरंजन, कधी नाट्यपूर्ण प्रसंगाचे वर्णन, तर कधी अवखळ, खट्याळ मीलनोत्सुक प्रियकराची तक्रार अशा विविध आयामांनी ही कविता आकाराला आली आहे.

## २.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

१. ऐने - आरसा

२. शेलाटी - बारीक

३. शिणणे - दमलो

४. तेधवा - तेव्हा

५. करात - हातात

६. कुंतलबंध - बांधलेले केस

## २.६ स्वयंअध्ययन प्रश्न आणि उत्तरे :

१) संसाराच्या बंधनात अडकलेल्या प्रेयसीचे वर्तन कसे आहे?

२) 'फुंकर' या कवितेमध्ये कोणकोणत्या भावांचे उत्कटपणे दर्शन घडविले आहे?

३) पौगंडावस्थेतील प्रेमामधील बेफिकीरीचे दर्शन कोणत्या कवितेतून घडते?

४) शरीराच्या सुंदरतेपेक्षा मनाच्या सुंदरतेला कोणत्या कवितेत कवी महत्त्व देतो?

५) शारीरिक सौंदर्याला कवीने कोणत्या कवितेत प्राधान्य दिले आहे?

**उत्तरे :**

१) संसाराच्या बंधनात अडकलेल्या प्रेयसीचे वर्तन 'जसे पूर्वी काहीच घडलेच नाही' असे आहे.

२) 'फुंकर' या कवितेमध्ये विभाव, अनुभाव आणि व्यभिचारी भावांचे दर्शन वसंत बापट उत्कटपणे घडवितात.

३) पौगंडावस्थेतील प्रेमामधील बेफिकीरीचे चित्रण 'जपावयाला शिकली होतीस' या कवितेत येते.

४) शरीराच्या सुंदरतेपेक्षा मनाच्या सुंदरतेला महत्त्व कवी 'आज अचानक' या कवितेत देतो.

५) शारीरिक सौंदर्याला कवीने नाजूक रुपडे या कवितेत प्राधान्य दिले आहे.

## २.७ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) वसंत बापट यांच्या कवितेतील प्रियकराचे व्यक्तिमत्त्व कशा प्रकारचे आहे?

२) वसंत बापट यांच्या कवितेची शैली स्पष्ट करा.

३) वसंत बापट यांचे मराठी कव्यपरंपरेतील स्थान स्पष्ट करा.

४) वसंत बापट यांच्या कवितेतील प्रियकर-प्रेयसीचे नाते कशाप्रकारचे आहे ते उदाहरणासहित स्पष्ट करा.

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१. वसंत बापट : 'ललित', सप्टेंबर १९८८.

२. कुलकर्णी गो. म. : 'आधुनिक मराठी कविता काही रुपे काही रंग', मेहता पब्लिशिंग हाऊस. (प्र.आ. १९९१)

३. बापट वसंत : 'सेतू', पॉप्युलर प्रकाशन, (प्र.आ. १९५७)

४. देशपांडे अ. ना. : 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास' (भाग दुसरा १९२०-५०) व्हीनस प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे ३० (तिसरी आवृत्ती १९७९).

❑❑❑

घटक २

# नारायण सुर्वे

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ नारायण सुर्वे यांची कविता
२.२.२ वसंत आबाजी डहाके यांची कविता

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्ट्ये :

विद्यार्थी मित्रहो, यापूर्वीच्या घटकात आपल्याला १९६० पूर्वीच्या कवितालेखनाचा परिचय झाला आहे. या घटकामध्ये आपण १९६० नंतरच्या कालखंडामध्ये काव्यलेखन करणाऱ्या कवींच्या काव्यलेखनाचा परिचय करुन घ्यायचा आहे. या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला '१९६० नंतरची कविता समजून घेता येईल.

- नारायण सुर्वे आणि वसंत आबाजी डहाके यांच्या काव्यलेखनाचे विशेष समजून घेता येईल.
- नारायण सुर्वे आणि वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेचा रुपबंध, शैली समजून येईल.
- नारायण सुर्वे आणि वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेचे विशेष समजून घेता येईल.
- नारायण सुर्वे आणि वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेचा रुपबंध, शैली समजून येईल.

## २.१ प्रस्तावना :

१९६० च्या सुमाराला मराठी काव्यक्षेत्रात संमिश्र अशा स्वरूपाचे चित्र दिसत होते. या आधीचे दशक नवकाव्याचे दशक  म्हणून ओळखले जात होते.या दशकावर मर्ढेकरांच्या कवितेचा ठसा उमटलेला होता. मर्ढेकरांनी आपल्या कवितेतून मानवी सुख दुःख,सांस्कृतिक मूल्यांचा होणारा ऱ्हास, मानवी जीवनात होणारी मूल्यांची पडझड याचा वेध घेतला. मर्ढेकरांच्या नंतर काव्यलेखन करणारे विंदा करंदीकर,वसंत बापट, इंदिरा संत, मंगेश पाडगावकर  हे सर्व कवी भिन्न भिन्न प्रवृत्तीचे होते. १९६० नंतर काव्यलेखन करणाऱ्या कवींची प्रवृत्ती या कवींपेक्षा वेगळी दिसून येते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पहिल्याच दशकात येतील समाजजीवनात वेगवेगळी स्थित्यंतरे जाणवू लागली. या कालखंडातील विविध घडामोडींनी येथील समाजजीवन विस्कळीत झाले. सुशिक्षित बेकारांचे तांडे महानगरीत दिसू लागले. या कालखंडात नारायण सुर्वेंची कविता वाचकांपुढे आलेली दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळातील जगणे सुर्वेंच्या कवितेचा विषय झालेला दिसतो. कामगार जगातील जगणे, कामगार चळवळीशी आलेला संबंध, १९४७ चे स्वातंत्र्य, मार्क्स –लेनीन च्या विचारांचा प्रभाव अशा अनेक गोष्टी सुर्वेंच्या कवितेतून पुढे येतात. सुर्वेंच्या कवितेतून येणारी माणसे ही प्रत्यक्ष जगण्यातून भेटलेली माणसे आहेत. कामगार आणि कष्टकरी वर्गाचे जगणे हे  त्यांच्या कवितेचे केंद्र झालेले आहे. साधरणपणे याच काळात मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात संतप्त तरुणांनी विविध चळवळी उभ्या केल्या.आधीच्या पिढ्यांनी निर्माण केलेले साहित्य नाकारणे हा त्यांचा हेतू होता. यामध्ये अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, वसंत आबाजी डहाके, भालचंद्र नेमाडे, वसंत गुर्जर, मनोहर ओक या कवींचा समावेश  होता. याठिकाणी  आपल्याला, नारायण सुर्वे आणि वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेचा येथे अभ्यास करायचा आहे .

## २.२ विषय विवेचन :

प्रस्तुत घटकामध्ये नारायण सुर्वे आणि वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेचा अभ्यास आपल्याला करायचा आहे.

## २.१ नारायण सुर्वे यांची कविता :

**अनुक्रमणिका**

**३.० उद्दिष्ट्ये**

**३.१ प्रास्ताविक**

**३.२ लेखक परिचय**

**३.३. विषयविवेचन**

**३.३.१ दोन दिवस**

**३.३.२ माझी आई**

३.३.३ **गिरणीची लावणी**

३.३.४ **पोष्टर**

३.३.५ **नेहरू गेले त्यावेळीची गोष्ट**

३.४ **सारांश**

३.५ **पारिभाषिक शब्द व शब्दार्थ**

३.६ **स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे**

३.७ **सरावासाठी स्वाध्याय**

३.८ **अधिक वाचनासाठी पुस्तके**

## ३.० उद्दिष्ट्ये

नारायण सुर्वे यांच्या दोन दिवस, माझी आई, गिरणीची लावणी, पोष्टर, नेहरू गेले त्यावेळची गोष्ट या कविता अभ्यासानंतर आपणास,

- १९६० च्या दरम्यान काव्यलेखन करणाऱ्या कवींची ओळख होईल.
- नारायण सुर्वे यांच्या समग्र लेखनाचा परिचय होईल.
- श्रमविषयक कवितांचे आकलन होईल.
- कवितेतील मार्क्सवादी जाणिवा लक्षात येतील.

## ३.१ प्रस्तावना :

१९६० च्या सुमारास मराठी साहित्यात अनेक स्थित्यंतरे झालेली दिसतात. या सुमारास नवी पिढी साहित्यक्षेत्रात प्रवेश करू लागली. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा परिपाक म्हणून मराठी भाषिक राज्याची स्थापनाही या सुमारास झाली. या १९६० आणि ७० च्या दशकात मार्क्सवादी जाणिवेचा प्रभाव या कालखंडावर पडलेला दिसून येतो. या कालखंडात मार्क्सवादी जाणिवांचा समर्थ आविष्कार नारायण सुर्वे यांच्या कवितेच्या रूपाने झालेला दिसतो. ज्या कामगार जगात नारायण सुर्वे जगले, वाढले त्यांची जाणीव त्यांच्या कवितेतून स्पष्टपणे दिसते. सुर्वे यांच्या कवितेतून आलेली सामाजिक जाणीव ही वास्तवाश्रयी आणि जहाल स्वरूपाची असल्याचे दिसते. मानवी सामर्थ्याची आशासूक्ते गाणारी मानवी सुखस्वातंत्र्याच्या नव्या मळवाटा धुंडाळणाऱ्या मुक्तिबोधाच्या कवितेची पार्श्वभूमी सुर्वेच्या कवितेला लाभली होती. औद्योगिक प्रगतीच्या भांडवलशाही भस्मासुराविरुद्धची प्रतिक्रिया मुक्तिबोधाच्या कवितेतून पुढे येत होती. सुर्व्यांच्या कवितेतील मार्क्सवादी जाणिवेचा

आविष्कार व्यापक आहे. त्यांच्या कवितेच्या अनुभवाचे संदर्भक्षेत्र, प्रामुख्याने कष्टकऱ्यांचे, उपेक्षितांचे जग राहिले आहे. कष्टकऱ्यांच्या जगाचे दर्शन सुर्वेच्या कवितेतून वाचकांच्या डोळ्यांसमोर उभे राहते.

## ३.२ लेखक परिचय :

नारायण सुर्वे यांचा जन्म मुंबई येथे झाला. एक अनाथ मूल लालबागच्या फुटपाथवर गिरणीकामगार गंगाराम सुर्व्यांना सापडले. एक दिवसाचे ते मूल गंगाराम आणि काशीबाईंनी सांभाळले. तेच हे नारायण सुर्वे. सुर्व्यांचे बालपण कामगार वस्तीत गेले. कामगार वस्ती आणि आजूबाजूच्या ख्रिश्चन व मुस्लिम वस्तीचे संस्कार घेऊन सुर्वे मोठे झाले. प्रारंभी सुर्व्यांचे शिक्षण इयत्ता चौथीपर्यंत झाले. १९३६ साली ते चौथी परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढे वैवाहिक जीवनात पी.टी.सी परीक्षा उत्तीर्ण झाले. सुरुवातीला कारखान्यात, टाटा ऑइलमिल मध्ये हमाली केली. नंतर शिक्षणखात्यात शिपायाची कायम नोकरी मिळाली. १९५७ मध्ये सुर्वे व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा उत्तीर्ण झाले. १९५९ मध्ये त्यांनी प्राथमिक शिक्षकाची सनद मिळवली आणि महापालिकेच्या नायगाव नंबर एक शाळेत त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी केली. कृष्णाबाई तळेकर यांच्याशी विवाह करून सुर्व्यांच्या गृहजीवनाची सुरुवात झाली.

सुर्व्यांची पहिली कविता १९५८ मध्ये 'नवयुग' मासिकात प्रसिद्ध झाली. १९६२ साली सुर्व्यांचे 'ऐसा गा मी ब्रह्म' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यानंतर 'माझे विद्यापीठ' (१९६६) 'जाहीरनामा' (१९७५) आणि 'नव्या माणसाचे आगमन (१९९५) असे चार कवितासंग्रह प्रकाशित झाले. याशिवाय विजय तापसे यांनी संपादित केलेल्या कवितांचा एक संग्रह १९९५ मध्येच प्रकाशित झाला आहे. सनद हा स्वतंत्र स्वरूपाचा काव्यसंग्रह नसून तो पूर्वप्रकाशित संग्रहामधील कवितांचा संग्रह आहे. याशिवाय नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता (संपा.– पॉप्युलर प्रकाशन २०११) निवडक नारायण सुर्वे (संपा.कुसुमाग्रज,१९९४) इत्यादी कवितासंग्रह प्रकाशित 'माणूस कलावंत आणि समाज' (१९९८) हा लेखसंग्रह प्रकाशित. 'दलित काव्यदर्शन', 'गाणी चळवळीची, 'कविता श्रमाची' आणि 'कॉ.डांगे: भारतीय राजकारणातील वादळ' इत्यादी ग्रंथाचे संपादन. 'तीन गुंड व सात कथा' 'दादर पुलाखालची मुले' ही अनुवादित पुस्तके. सोव्हिएत लँड नेहरू पारितोषिकाचे मानकरी. परभणी येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. १६ ऑगस्ट २०१० रोजी नारायण सुर्वे यांचा मृत्यू झाला.

## ३.३ विषय विवेचन :

नारायण सुर्वे हे १९६० नंतरचे मराठी कवितेतील महत्त्वाचे कवी आहेत. त्यांनी आपल्या कवितेतून प्रामुख्याने कष्टकऱ्यांचे, उपेक्षितांचे जग व त्यांच्या समस्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मुंबई महानगराच्या लढाऊ आणि कामगार वर्गाचे विश्व आपल्या कवितेतून त्यांनी उभे केले. त्यांच्या दोन दिवस, माझी आई, गिरणीची लावणी, पोष्टर, नेहरू गेले त्यावेळची गोष्ट या कवितांचा अभ्यास या घटकांत करायचा आहे.

### ३.३.१ दोन दिवस :

नारायण सुर्वेच्या कवितेत येणारे अनुभव विश्व हे त्या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवींच्या कवितेत येणाऱ्या अनुभवविश्वापेक्षा वेगळे आहे. हे जग कामगारांचे, कष्टकऱ्यांचे आहे. केवळ जगण्यासाठीच ज्यांना रोज संघर्ष करावा लागतो, अशा माणसांचे जग सुर्वे यांच्या कवितेचा एक महत्त्वाचा भाग आहे. हे जग कामगारांचे, कष्टकऱ्यांचे आहे. या जगातील लोकांना जगण्यासाठी रोज संघर्ष करावा लागतो. कारखान्यात मजुरी करणारे, पोस्टर डकवणारे, खांबावर चढून विजेच्या तारा जोडणारे, बिगारी नाक्यावर गोळा होणारे असे नाना प्रकारचे कष्टकरी यांच्या वैशिष्ट्यांसह कवितेत येतात.

'दोन दिवस' ही कामगार वर्गाच्या समूहभावनेच चित्रण करणारी प्रातिनिधिक स्वरूपाची कविता आहे. आपल्या आयुष्याचा हिशोब मांडून डोईवर किती उन्हाळे राहिले आहेत याचे गणित मांडणाऱ्या माणसांचे हे जग आहे. कवितेतील नायक कामगार आहे. त्याचे कामगार असणे ही त्याच्यासाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. कष्टकऱ्यांची, उपेक्षितांच्या जगाविषयी सुर्वे यांच्या मनात सद्भावना प्रकट होताना दिसते. अर्थातच सुर्वे हे कष्टकऱ्यांच्या जगातील कवी आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्याविषयी सहभावना असणे साहजिकच आहे. कष्टकऱ्यांच्या जगाविषयी भावना व्यक्त करताना कोणताही आक्रस्ताळेपणा त्याच्या कवितेत नाहीच पण या वर्गाला ते दयेचा विषय बनवत नाहीत. जे सोसले, भोगले त्याचे आहे तसे चित्रण ही कविता करते. कष्टकऱ्यांच्या जगाचे झळझळीत रूप, भविष्य काळातील स्वप्नांचे आभास, त्यांचे जगणे ही कविता वाचकांपुढे आणते. दुःख पेलावे कसे आणि त्यातून जगण्याचे मार्ग कसे काढावेत हे याच जगाने शिकवले. जगणे शिकवणारी ही एक मोठी शाळा असल्याचे कवी म्हणतो. 'भाकरीचा चंद्र' शोधण्यात संपूर्ण आयुष्य गेले. पोट भरण्याच्या विवंचनेत दुसरे काही करता आले नाही असे कवी म्हणतो. व्यक्तिगत स्वार्थाचा विचार न करता समाजातील शोषित पीडितांच्या जगाचा विचार कायम हा नायक करताना दिसतो. (यातील नायक हा कामगार आहे.) आपले आयुष्य एक झोतभट्टी असून; झोतभट्टीत शेकून झळा सहन करून जसा पोलादाला आकार येतो, तसा आकार आपल्या आयुष्याला येईल असे नायक म्हणतो. झोतभट्टीतले पोलाद, बॉयलर या प्रतिमा रुढ अर्थाने काव्यात्म नाहीत. परंतु त्या ज्या संदर्भात येतात त्यातून अनुभवाची निर्मिती झालेली असते. 'झोतभट्टीत' शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले' या शब्दांमधून नायक सभोवतालच्या जीवनाची दाहकता व्यक्त करतोच, शिवाय नायकाचा जीवनसंघर्षही यातून प्रकट होतो. कष्टकरी कामगारांच्या आयुष्यातील वेदना, त्यांच्या वेदनामय जीवनाच्या गतिशील प्रक्रियेचा अनुभव ही कविता वाचकास देते. सुर्वेंच्या कवितेतील अनेक प्रतिमा या अशा प्रकारे अनुभवदर्शक आहेत.'' (पृ:३४ पाध्ये, दिगंबर: प्रस्तावना)

नारायण सुर्वे यांच्या कविता लोककलांशी त्यांच्या आलेल्या संबंधातून रचनेचे प्रयोग दाखविते. हे प्रयोग फार मोठ्या प्रमाणात नाहीत. मराठी कवितेला परिचित असणाऱ्या रचनांकडे ते वळलेले दिसतात. अशा रचनांमध्ये धृपदातील मूळ अनुभवाला विविधांगाने फुलविण्याचे कार्य कवी करीत असतात. 'दोन दिवस' ही कविता एका वेगळ्या रचनाबंधाच्या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. या कवितेतील -

**'दोन दिवस वाट पाहण्यात गेले;**
**दोन दुःखात गेले**

**हिशोब करतो आहे किती**
**राहिलेत डोईवर उन्हाळे'**

या दोन ओळी म्हणजे एक प्रतिक्रिया आहे. या प्रतिक्रियेतील भाव वेदनेचा आहे. या वेदनेशी संवादी अशा तीन प्रतिक्रिया पुढील सहा ओळींतून व्यक्त होतात आणि या वेदनेला पेलून धरणारे भाव त्यापुढील सहा ओळींतून व्यक्त झाल्यानंतर –

**'झोतभट्टीत शेकावे पोलाद**
**तसे आयुष्य छान शेकले**
**दोन दिवस वाट पाहण्यात गेले;**
**दोन दुःखात गेले.'**

अशा शब्दांनी ही कविता पूर्ण होते. हा रचनाबंध आहे. अशा अनेक कविता सुर्व्यांच्या समग्र कवितेत दाखवता येतात.

### ३.३.२ माझी आई :

नारायण सुर्वेची 'माझी आई' ही कविता दोन भागात लिहलेली आहे. कवितेचा पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे त्याचे भाग करता येतील. कामगार वस्तीतील काम करणाऱ्या आईची धावपळ कवीने अधोरेखित केली आहे. गोष्टीरूपाने त्यांनी आपल्या आईविषयी आठवणी, अनुभव कथन केल्या आहेत. ही कविता म्हणजे भूतकाळातील काही निवडक प्रसंगाचे निवेदन आहे. आईची मुलांसाठी सुरु असणारी धडपड, तिचा आनंद, कष्ट करून मुलांचा सांभाळ करीत असताना होणारी तिची ओढाताण आणि मग आईच्या अचानक मृत्यूमुळे निर्माण झालेले कारुण्य या परस्पर संवादी भावांची रचना या कवितेत केली आहे. गिरणीत काम करणारी आई सकाळी लवकर उठून गिरणीत जाते. मुलांना प्रेमाने जवळ घेऊन भांडू नका असे सांगते. झपझप चालत ती गिरणीच्या दिशेने जाते. दसऱ्याच्या आदल्या दिवशी आई पाचही मुलांना घेऊन जत्रेत जाते. लहान लहान गोष्टी मुलांना घेऊन देते. आईसोबत फिरताना तिच्या सहवासात मुलांना होणारा आनंद कवी व्यक्त करतो आहे.

कवितेच्या उत्तरार्धात मात्र आईच्या मृत्यूमुळे निर्माण झालेली परिस्थिती कवी व्यक्त करतो आहे. एक दिवस आईला गाडीतून मृत अवस्थेत घरी आणले जाते. आईची सोबतीण साळू, नायकाला जवळ घेते त्याला आधार देते, पण ही सारी मुले घाबरून जातात व एकमेकाला बिलगून बसतात. आईचे छत्र हरपल्याची जाणीव त्यांना होते. आई नसल्यामुळे आलेले पोरकेपण झाकण्यासाठी आईच्या मायेची चादरच त्यांनी ओढून घेतली असे नायक म्हणतो. आई सोडून दुसरे कोणीच जवळचे नव्हते आणि आता आईचाही आधार हरवल्यामुळे आलेले एकटेपण येथे कवी अधोरेखित करतो.

**'आधीचे नव्हतेच काही**
**आता आई देखील नाही**
**अश्रूंना घालीत अडसर**

**जागत होतो रात्रभर**
**झालो पुरते कलंदर'**

या शब्दांतून तीव्र भावनात्मक ताण कवी व्यक्त करतो. आई गेल्यानंतरची शोकात्म परिस्थिती भावनेच्या पातळीवर राहणारा एक उत्कट अनुभव कवीने व्यक्त केला आहे.

### ३.३.२ गिरणीची लावणी :

नारायण सुर्वेची गिरणीची लावणी ही कविता लावणीचा बाज वापरून लिहली गेली आहे. सकाळी सात वाजता गिरणीचा भोंगा वाजताच पहिली पाळी सुरु होते. कष्टकरी आपल्या कष्टातून वसुंधरेला वस्त्राच्या माध्यमातून नटवतात अशी कल्पना कवी करतो. ही कविता म्हणजे निवेदकाच्या जीवनविषयक जाणिवेच्या घडणीचा अनुभव आहे. हा संदर्भ कष्टकऱ्यांचे जग व त्याबद्दलचा अनुभव याच्याशी निगडित आहे. लावणीचा बाज वापरून गिरणगावातील कष्टकऱ्यांची व्यथा कवितेत व्यक्त केली आहे. गिरणीत तयार होणारा कपडा हा विविधरंगी आहे. कधी आभाळाचा रंग तो होतो, तर कधी हिरव्यागार शेताचा रंग त्याला मिळतो. इंद्रधनूच्या सात रंगाप्रमाणे हे वस्त्र वेगवेगळ्या रंगात तयार होते. कष्टकरी वर्गाच्या घामाची कहाणीच जणू येथे सांगितली आहे.

ऋतूबदलाप्रमाणे इथला वस्त्रांचा मळाही विखुरला आहे.चैत्राच्या झळा सोसण्यासाठी, श्रावणातील पावसापासून रक्षण करण्यासाठी सारीच वस्त्रे कबीर विणत आहे. अशी प्रतिमा कवीने या निर्मितीला वापरली आहे. कष्टकऱ्यांचे जग जे वस्त्र निर्माण करीत आहे. ते कुठे कुठे वापरले जात आहे याची समर्पक उदाहरणे कवीने दिली आहेत. कौरवांच्या दरबारात द्रौपदीचे वस्त्रहरण होत असताना द्रौपदीची लाज राखण्यासाठी कृष्णानेच वस्त्र पुरवले. पीतांबरासाठीचे, पैठणीसाठीचे वस्त्र निर्माण करणारा हा कष्टकरी कामगारच आहे, पण हे सारे निर्माण करणारा, या घडीला मालक नसून चोर समजला जात आहे. धनिकांच्या म्हणजे मालक वर्गाचा इतका जोर वाढला आहे की कष्टकरी जनतेला काहीच किंमत राहिली नाही. इथे मालक वर्ग म्हणजे भांडवलदार आणि कष्टकरी वर्गातील तफावत सांगितली आहे. अपुऱ्या पैशाअभावी रोजची चूल पेटवली जात नाही. कारण इंधनालाच पैसे नाहीत. या कष्टकऱ्यांनी आपली भूक कशी भागवावी, पोटाला काय घालावे असा प्रश्न नायक येथे विचारतो. या पोटाला टाके घालून शिवावे की काय, असा हताश करणारा प्रश्न कवी विचारत आहे. सुर्वे यांच्या कवितेतून भोवतालचे वास्तव जीवन जगण्याविषयीची जाणीव सातत्याने प्रकट होत राहते. एका बाजूला संपत्तीची समाजात वाढ होत आहे, तर दुसऱ्या बाजूला दैन्यही वाढत आहे. ही नकारात्मक बाजू कवी वाचकांच्या निदर्शनाला आणतो आहे.

### ३.३.४ पोष्टर :

सुर्वे आपल्या कवितेतून अपरिचित जगाचे दर्शन घडवतात. 'पोष्टर' ही कविता सामाजिक अंगाने जाणारी आहे. वरवर पाहता ही कविता विनोदी वाटते. सुर्व्यांचे काव्यवाचन या कवितेने रंगविले आहे. ही कविता म्हणजे धगधगते वास्तव आहे. कामगारांच्या हक्कासाठी लढणाऱ्या, चळवळीत जे काम आपल्या वाट्याला येईल ते काम करणाऱ्या तरुण वर्गाचे प्रातिनिधिक चित्रण पोष्टर या कवितेत येते. कवितेतील नायक, हणम्या, शिंदे आणि

इसल्या हे चार वेगवेगळ्या घरातून आलेले तरुण कामगार चळवळीशी संबंधित पोष्टर्स चिटकवण्याचे काम करीत आहेत. यातील प्रत्येकजण त्याच्या त्याच्या विविध भावांमुळे आठवणीत राहतात. वास्तवाचे तपशील आणि संवाद यामधून या कवितेत अनुभव व्यक्त झाला आहे. 'पोष्टर' या कवितेतील पोस्टर चिटकवणारे चारही तरुण बोलीभाषेतून एकमेकांशी संवाद साधतात आणि तो अधिक परिणामकारक आहे. दिवसभर काम केल्यावर रात्रीच्या वेळी हे चारही तरुण बाहेर पडतात. एकजण शिडी घेतो,एक खळ घेतो,एक पोस्टर चिटकवायचे काम करतो, एक या सर्वांना मदत करतो. रात्रीची कामे करीत असताना शक्यतोवर आवाज होऊ नये याची काळजी घेण्याचा प्रयत्न हे तरुण करीत आहेत. पोष्टर वाचले जातील अशा ठिकाणी चिटकवले पाहिजेत हे भान तरुण जपताहेत. इसल्याची आई 'कडक', शिंदेची बायको चांगली खळ करते. पण बाप 'खविस'. इस्ल्याला त्याच्या प्रेयसीशी लग्न करायचे आहे. अशी विविध व्यक्ती त्यांच्या विविधांगी स्वभाव वैशिष्ट्याप्रमाणे नायकाने कवितेत चितारल्या आहेत.

पोष्टर चिटकून होईपर्यंत खूप उशीर होतो. येतायेताच दुसऱ्या दिवशीच्या मीटिंगची चर्चा ते तरुण करतात. पण यातल्या 'इसल्याला' झोप आलेली आहे. आकाशातील चंद्राचा तुकडा बघून त्याला गालिबची गझल आठवते. आकाशातील चंद्राचा तुकडा बघून इस्ल्याला आपल्या मैनेची आठवण येते. इसल्याचे लग्न करण्याला हे तरुण पाठिंबा देतात. कामगार वस्तीतल्या अभावग्रस्त तरुणाचे जगणे त्यांच्या दबल्या गेलेल्या इच्छा – आकांक्षा यांच संमिश्र चित्रण नारायण सुर्वे त्यांच्या कवितेतून येते. वास्तवाचे तपशील आणि संवाद यामधून व्यक्त झालेला काव्यानुभव अधिक परिणामकारक ठरतो.

### ३.३.५ नेहरू गेले त्यावेळची गोष्ट :

'नेहरू गेले त्यावेळची गोष्ट' ही नारायण सुर्वेंची राजकीय भान व्यक्त करणारी महत्त्वाची कविता आहे. नेहरूंच्या जाण्यामुळे वातावरणात व कामगारविश्वात निर्माण झालेल्या खिन्न उदासीनतेचे भाव, त्यातून येणारी निःशब्दता कवितेतून व्यक्त झाली आहे. वैचारिक अंगाने जाणारी ही कविता आहे. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून नेहरूचे भारताच्या घडणीत महत्त्वाचे स्थान होते. भारताला धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्याचे अधिष्ठान मिळावे म्हणून त्यांनी मोठे योगदान दिले. या लोकनेत्याच्या निधनाची बातमी,त्या परिस्थितीचे चित्रण ही कविता करते. शहराचा रंग बदलत गेला. आधी शहर करडे होत गेले आणि त्यानंतर त्याला अंजिरी रंग आला. या प्रतिमांच्या माध्यमातून कवी शहरात पसरलेली उदासी, खिन्नता याचे चित्रण करतो. शहरातील कारखानेही नेहरूंच्या निधनाची वार्ता समजताच विचारात बुडाले आणि ओले खमीस खांद्यावर टाकून कामगार खुराड्याकडे वळले.हा प्रतीकात्मक पातळीवरील अनुभव कवितेतून व्यक्त होतो. नेहरूंच्या निधनाची वार्ता समजताच उदासीनतेची छटा निर्माण होते. कष्टकरी वर्गात निर्माण झालेले शोकात्म वातावरण, पुढे वेश्या जीवनातील संवाद व 'शीण पेलणारे जग खाटेवर कलले' या शब्दांमधून, विश्रांतीतून निर्माण होणारी निःशब्दता आणि या विरोधातून सूक्ष्म असा ताण या ठिकाणी निर्माण होतो. नेहरू गेल्यामुळे सगळ्यांनीच कामाला सुट्टी घेतली.कष्टकरी वर्गाला सुद्धा इतक्या मोठ्या राजकीय व्यक्तिमत्वाचे जाणे उदास करून जाते.त्यानंतर कागदी

खोळीतून उजेड घेऊन जाणारा हातगाडीवाला येतो. कवी त्याला विचारतो, हा प्रकाश आता कशाला नेतो आहेस? तो उत्तर देतो, 'वा राव; पुढे काळोख दात विचकीत असेल!'

कवितेच्या सुरुवातीला व्यक्त झालेले उदासीनतेचे भाव आणि हातगाडीवाल्याच्या खोळीतील प्रकाशाच्या रूपाने व्यक्त होणारी कष्टकऱ्यांची जिद्द व आशा असा संमिश्र विरोध दर्शवून ही कविता पूर्ण होते. 'नेहरू गेले त्यावेळची गोष्ट' या शीर्षकातून व्यक्त होणाऱ्या या कवितेतून विविध घटनाप्रसंग आणि त्यातून निर्माण झालेले भाव अत्यंत सूक्ष्म पातळीवर टिपलेले आहेत. आधुनिक समाजजीवनातील वेदनेची चित्रे कवी शब्दबद्ध करतोच पण त्यातील हळुवार मानवी भाव व भविष्यविषयीचा दणकट आशावाद ही कविता व्यक्त करते.

## ३.४ सारांश :

सुर्व्यांच्या कवितेने मराठी कवितेचे दालन अधिक संपन्न केले. त्यांच्या सुरुवातीच्या कवितांमध्ये स्वानुभवाचे कथन येते. महानगरातील पांढरपेशा माणूस सभोवतालच्या दुनियेतील दैन्य आणि दुरवस्था पाहतो. तसेच दुसऱ्या बाजूला श्रीमंतांचे थाटही बघतो. त्याबद्दल त्याला आकर्षण वाटते. पण गरीब जनता कष्टकरी जनता त्याच्या खिजगणतीत नसते. हे लोकही आपल्यासारखेच आहेत याची जाणीव त्यांना नसते. ही जाणीव वाचकांना करून देण्याचे काम सुर्व्यांच्या कवितांनी केले. कष्टकऱ्यांच्या, उपेक्षितांच्या जगाविषयी एक सद्भावना व्यक्त करण्याचे काम सुर्व्यांच्या कवितेने केले.

## ३.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

१. भूपाळी - पहाटेच्या वेळी म्हटले जाणारे गीत

२. खवीस - कडक

३. डकवणे - चिकटवणे

४. चिरूट - विडी

५. खमीस कपडा

६. दात विचकणे - चिडवणे

## ३.६ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे :

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) 'पोष्टर' या कवितेतील 'पोष्टर' चिटकवायला गेलेल्या पात्रांची नावे सांगा.

२) 'आई' सकाळी लवकर कामासाठी कुठे जात होती?

३) हातगाडीवाला खोळीतून प्रकाश कशासाठी नेत आहे?

४) आकाशातील चंद्राचा तुकडा बघून इस्ल्याला कोणाची आठवण येते?

५) कवी संपूर्ण आयुष्य काय शोधण्यात गेले असे म्हणत आहे?

## ३.७ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१) हणम्या, इसल्या, शिंदे आणि कवी नायक ही पोष्टर कवितेतील पात्रांची नावे आहेत.

२) आई सकाळी लवकर कामासाठी गिरणीत जात होती.

३) हातगाडीवाला खोळीतून प्रकाश काळोख नष्ट करण्यासाठी नेत आहे.

४) आकाशातील चंद्राचा तुकडा बघून इसल्याला गालीबच्या गझलेची आठवण येते.

५) कवी संपूर्ण आयुष्य भाकरीचा चंद्र शोधण्यात गेले असे म्हणत आहे.

## ३.८ सरावासाठी स्वाध्यास :

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) नारायण सुर्वेच्या दोन दिवस या कवितेतून व्यक्त होणाऱ्या जाणिवा स्पष्ट करा.

२) नारायण सुर्वेच्या कवितेतून येणारे अनुभवविश्व कशा प्रकारचे आहे स्पष्ट करा.

३) नारायण सुर्वेच्या कवितेतून येणाऱ्या अनुभव प्रतिमांचे स्वरूप स्पष्ट करा.

४) नेहरू गेल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचे चित्रण करा.

५) आईचा मृत्यू झाल्यामुळे मुलांमध्ये कशा प्रकारे भावनात्मक ताण निर्माण झाला?

**ब) लघुत्तरी प्रश्न.**

१) नारायण सुर्वेच्या कवितेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) 'पोष्टर' या कवितेतील पात्रांविषयी थोडक्यात लिहा.

३) गिरणगावाच्या संस्कृतीविषयी थोडक्यात लिहा.

४) सुर्व्यांच्या कवितेची भाषा कशा प्रकारची आहे?

५) 'दोन दिवस' ही नारायण सुर्वेची कविता कशाचे चित्रण करते?

## ३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता, प्रस्तावना (दिगंबर पाध्ये) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

२. मर्ढेकर - सुर्वे : दोन युगमुद्रा, डॉ अशोक नामदेव पळवेकर, सुगावा प्रकाशन, पुणे. (प्रथमावृत्ती आ. २००८)

३. 'कवितेपासून कवितेकडे' विजया राजाध्यक्ष, विजय प्रकाशन, नागपूर (प्रथमावृत्ती २०१२)

४. कुळी स.त्र्यं, ; तीन अर्वाचीन कवी : मार्क्सवादी दृष्टिक्षेप, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई. (प्रथमावृत्ती १९८९)

५. नेरुरकर प्र.श्री. (संपा). सर्व सुर्वे : नारायण सुर्वे, डिंपल पब्लिकेशन, नौपाडा (प्रथमावृत्ती १९८५).


❑❑❑

## ४.१ वसंत आबाजी डहाके यांची कविता :

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ लेखक परिचय

४.३. विषय विवेचन

 ४.३.१ समुद्र

 ४.३.२ वास्तववाद

 ४.३.३ खेळ

 ४.३.४ आख्यान

 ४.३.५ पुतळे

४.४ सारांश

४.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.६ स्वयं–अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


### ४.० उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत घटकाचे अध्ययन केल्यामुळे आपणास,

- महानगरीय कविता म्हणजे काय ते समजेल.
- १९६० च्या दरम्यान काव्यलेखन करणाऱ्या कवींची ओळख निर्माण होईल.
- वसंत आबाजी डहाकेंच्या निरिक्षण व चिंतनशीलतेचा प्रत्यय येईल.
- वसंत आबाजी डहाके यांच्या काव्यलेखनाचा परिचय होईल.

## ४.१ प्रस्तावना :

१९६० च्या सुमाराला मराठी कवितेच्या क्षेत्रात वेगळे चित्र दिसते. या आधीचे दशक हे नवकाव्याचे दशक म्हणून ओळखले जात होते. या दशकातील कवींवर मर्ढेकरांच्या कवितेचा प्रभाव काही प्रमाणात दिसून येतो. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्याच दशकात समाजजीवनात मोठ्या प्रमाणात नैराश्य आणि वैफल्य जाणवू लागले. सुशिक्षित वर्ग हा बेकारीला मोठ्या प्रमाणात तोंड देऊ लागला. सुशिक्षित बेकार तरुणांचे तांडे शहरात मोठ्या प्रमाणात दिसू लागले. महानगरे अधिकाधिक बकाल होऊ लागली. हा सुशिक्षित तरुण वर्ग आपापल्या पद्धतीने संताप व्यक्त करू लागला. मराठी वाङमयाच्या क्षेत्रात या काळात या तरुणांनी काही चळवळी उभ्या केल्या. या उद्रेकातून निर्माण झालेली महत्त्वाची चळवळ म्हणजे लघुअनियतकालिकांची चळवळ होय. १९५५ च्या आसपास लघुअनियतकालिकांच्या चळवळीने चांगलाच जोम धरला. रमेश समर्थ यांनी 'शब्द' हे लघुअनियतकालिक पहिल्यांदा १९५५ मध्ये प्रकाशित केले. १९६० साली अशोक शहाणे यांचे 'अथर्व', त्रिशंकू, रुचा अशी अनेक अनियतकालिके या कालखंडात निघाली. लघुअनियतकालिकांतून जी तरुण कवींची पिढी उदयाला आली त्या पिढीने या दोन दशकातील कवितेमध्ये मोलाची भर घातली. प्रस्थापित व्यवस्थेविरोधीचा एक सूर या कवितेमध्ये तर होताच पण त्याबरोबरच उज्ज्वल भविष्यकाळाची स्वप्ने सुद्धा ही पिढी पाहात होती. कवितेचा आधीचा वारसा नाकारून स्वबळावर उभे राहण्याचा प्रयत्न या कवितेने केला. अभिव्यक्तीच्या पातळीवरील विविध प्रयोग या कवींनी आपल्या कवितेतून केले. या कवींनी आपल्या स्वतंत्र मार्ग शोधण्याचा प्रयत्न लघुअनियतकालिकाच्या चळवळीतून केलेला दिसतो.

१९६० च्या काळात अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, नामदेव ढसाळ, मनोहर ओक, तुलसी परब, वसंत दत्तात्रय गुर्जर, वसंत आबाजी डहाके यांनी आधुनिक मराठी कवितेला एक स्वतंत्र ओळख निर्माण करून दिली. लघुअनियतकालिकाच्या चळवळीतून काव्यलेखनाला सुरवात करीत मराठी काव्यविश्वात स्वतःचे असे वेगळे संवेदन वसंत आबाजी डहाके यांनी तयार केले. मराठी कवितेतील रोमँटिकतेचा काळ मागे पडून आधुनिकतावाद जाणीवांचे प्रक्षेपण १९६० नंतरच्या कवितेतून होऊ लागले.

## ४.२ लेखक परिचय :

प्रा. वसंत आबाजी डहाके हे सुमारे सहा दशकांपासून कविता, ललित गद्य, कथा, कादंबरी, एकांकिका, नाटक या ललित वाङ्मय प्रकारांसह संशोधन, समीक्षा व कलाविषयक लेखन करीत आहेत. मराठी वाङ्मयकोश, वाङ्मयीन – संज्ञा संकल्पना कोश अशी महत्वाची संपादने त्यानी केली आहेत.

वसंत आबाजी डहाके यांचा जन्म यवतमाळ जिल्ह्यातील 'बेलोरा' या गावी ३० मार्च १९४२ ला झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण बेलोरा येथे तर पाचवी ते बी.ए. पर्यंतचे शिक्षण चंद्रपूर येथे झाले. शुभवर्तमान (१९८७), योगभ्रष्ट (१९७२), शुन:शेप (१९९६), चित्रलिपी हे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत.

**ललित :**

अधोलोक (कादंबरी), यात्रा-अंतर्यात्रा (ललितलेख ), प्रतिबद्ध आणि मर्त्य (कादंबरी), मालटेकडीवरून (ललित लेखसंग्रह), सर्वत्र पसरलेली मुळे (दीर्घ काव्य).

**वैचारिक/ संशोधनपर :**

कवितेविषयी, दृश्यकला आणि साहित्य,मराठीतील कथनरूपे, मराठी नाटक आणि रंगभूमी - विसावे शतक,मराठी समीक्षेची सद्यस्थिती आणि इतर निबंध, मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती (संशोधित लेखन).

**संपादित साहित्य :**

निवडक सदानंद रेगे (१९९६), शालेय मराठी शब्दकोश (१९९७), संक्षिप्त मराठी वाङ्मय कोश (१९९८), वाङ्मयीन संज्ञा आणि संकल्पना कोश.

**अन्य भाषांत भाषांतरित साहित्य :**

टेररिस्ट ऑफ द स्पिरिट - रणजित होस्कोटे, मंगेश कुलकर्णी (अनु.), १९९२ (योगभ्रष्ट ह्या काव्यसंग्रहाचा इंग्लिश अनुवाद).

**गौरव, पुरस्कार :**

कादंबरी व कवितेसाठी १९८१ व १९८७ साली महाराष्ट्र राज्य पुरस्कार., २००३ मध्ये गंगाधर गाडगीळ पुरस्कार., २००५ मध्ये महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार., २००९ मध्ये विदर्भ साहित्य संघाचा 'जीवनव्रती' पुरस्कार., साहित्य अकादमी पुरस्कार २००९ : 'चित्रलिपी' या काव्यसंग्रहासाठी., २०१० मध्ये मास्टर दीनानाथ प्रतिष्ठानतर्फे 'शांता शेळके' पुरस्कार., कविवर्य दामोदर अच्युत कारे पुरस्कार., पुणे मराठी ग्रंथालय पुरस्कार., ८५ व्या मराठी साहित्य संमेलनाचे निर्वाचित अध्यक्ष - (चंद्रपूर, २०१२), २०१९मध्ये जनस्थान पुरस्कार.

**इतर :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील छायाचित्रात्मक ग्रंथासाठी विशेष योगदान.

## ४.३ विषय विवेचन :

आधुनिक मराठी कवितेच्या क्षेत्रामध्ये आपल्या वेगळेपणाने उमटून देसणारे जे मोजके कवी आहेत यातील वसंत आबाजी डहाके हे एक नाव आहे. डहाकेंची कविता आपला निराळाच मार्ग शोधताना दिसते. डहाकेंच्या कवितेतील आशय भोवतालच्या वास्तवाशी संबद्ध आहे. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडींविषयी कवी जागरूक आहे. महानगरातील असुरक्षित, असाहाय्य्य जीवन त्यामधील विविध ताणतणाव या ताणतणावाला तोंड देताना येणारे वैफल्य, एकाकीपणा आणि अंतिमतः रितेपणाचा सर्वत्र निरर्थकता असल्याचा अनुभव या

कवितांमधून येताना दिसतो. डहाकेच्या कवितांतून राजकीय घडामोडींना अपरिहार्यपणे स्थान मिळवलेले दिसते. आपल्या कवितेतून डहाके जे वास्तव ते व्यक्त करू पाहता आहेत ते रोजच्या जीवनातील आहे. आशय भोवतालच्या वास्तवाशी संबद्ध आहे. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडींविषयी कवी जागरूक आहे. महानगरातील असुरक्षित, असाहाय्य्य जीवन त्यामधील विविध ताणतणाव या ताणतणावाला तोंड देताना येणारे वैफल्य, एकाकीपणा आणि अंतिमतः रितेपणाचा सर्वत्र निरर्थकता असल्याचा अनुभव या कवितांमधून येताना दिसतो. डहाकेच्या कवितांतून राजकीय घडामोडींना अपरिहार्यपणे स्थान मिळवलेले दिसते. आपल्या कवितेतून डहाके जे वास्तव व्यक्त करू पाहात आहेत ते रोजच्या जीवनातील आहे.

**प्रस्तावना :**

वसंत आबाजी डहाके यांच्या कवितांचा लेखनकाळ हा साठीचा होता. या कालखंडातील राजकीय आणि सामाजिक परिस्थिती अतिशय संमिश्र अशा स्वरूपाची होती. दुसरे महायुद्ध, स्वातंत्र्यप्राप्ती, आणीबाणीचा काळ, सर्व सामान्य जनतेचा झालेला भ्रमनिरास, यामुळे एकप्रकारे निर्माण झालेली विषण्णता या कालखंडाला व्यापून राहिलेली होती. त्यामुळे एक प्रकारची मानसिक अस्वस्थताही या काळात निर्माण झाली. ती या कवितांमधून स्पष्टपणे दिसते. या कवितांमधून कवी 'मी' चा वेगवेगळ्या अंगांनी शोध घेताना दिसतो. मानवी अस्तित्वाशी निगडित असलेल्या अटळ आणि अपरिमित दुःखाचे, वेदनेचे त्यात मानवी संबंधामध्ये येणारा दुरावा, परिस्थितीतून निर्माण होणारी तगमग, जगण्यातील अर्थहीनता त्यामुळे येणारी विषण्णता अशा अनेक छटा आहेत. विसाव्या शतकामधल्या माणसाच्या रोजच्या जगण्याचा थकवा, संत्रास, त्याचे भयभयीत जगणे, त्याची दयनीयता आणि राजकीय सत्तेचा त्यांच्या जगण्याशी असलेला दुरावा किंवा ती करीत असलेला दहशतीचा वापर हे सारे या कवितांमधून विलक्षणपणे व्यक्त होते. वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेतील समकालीन, सामाजिक, राजकीय वास्तवाचे प्रखर भान असल्याचे दिसते. कवितेचे कवितापण ढळू न देता कवी वर्तमान सामाजिक वास्तवाचे भयवादी स्वरूप कवितेतून मांडतो.

## ४.३.१ त्या संध्याकाळी समुद्र :

महानगरीय जीवन जाणिवांचे अनेक तपशील डहाके यांच्या कवितेत येतात. भोवतालच्या परिसराविषयी कवी आपल्या कवितेतून व्यक्त होतो. शहर- महानगर परिसरात हरवलेला माणूस हे त्यांच्या कवितेचे सूत्र आहे. महानगरातील माणूस हा मुळे धरू न शकणारा आणि हरवलेला आहे असे कवीला वाटते. त्यामुळे तो आतून परका, एकटा, उदास आहे. डहाकेंच्या कवितांतून महानगरीय जाणीव आणि त्यापलीकडचे भावविश्व व्यक्त होताना दिसते. 'त्या संध्याकाळी समुद्र' या कवितेतून कवी शहराचा एक भाग असलेल्या समुद्राचे स्वत्वही महानगराने हिरावून घेतले आहे. ही जाणीव व्यक्त करतो.

कवीला आधार देणारा समुद्र चिंताग्रस्तच वाटतो. खरे तर प्रत्येक वेळी तो कवीला आधार देतो. त्याच्या आसपास राहातो. गर्दीमध्ये रस्त्यावर आपल्या मागून समुद्र येतो आहे की काय अशी जाणीव कवीला होते. कवीला बैचेन वाटते.

**“त्या प्रत्येक क्षणी समुद्र होता आसपास**
**दुःखाचा हळुवार स्वर घेऊन.”**

या ओळीतून कवीला समुद्राचा आधार वाटत असल्याची भावना व्यक्त होते. पण कधी कधी हा समुद्र एखाद्या रक्ताळलेल्या घोड्यासारखा कवीला वाटतो. तो मंदपणे कण्हतो आहे. ते कण्हणे ऐकू आल्यांनतर कवीला समुद्राचा संपूर्ण आधार वाटेनासा होतो. या कवितेतील समुद्र ही कवीच्या बैचेन अवस्थेशी कण्हणाऱ्या मनाची प्रतिमा बनते. महानगराच्या आयुष्याने समुद्राचे स्वत्वही हिरावून घेतले आहे. कवी मुंबईसारख्या महानगरात राहात आहेत. कवी आपल्या कवितेतून महानगरातील माणसाचे एकाकीपण व्यक्त करतो. महानगरात कोठेही गेले तरी त्याला करमत नाही. पुस्तकाचे दुकान, आर्ट गॅलरी, खटाववाडी, गिरणगाव फोर्टमधले फुटपाथ ही ठिकाणे कवीच्या जीवनातील अविभाज्य घटक आहेत.

महानगरातील गर्दीही कवीचे हे एकटेपण कमी करू शकत नाही. जिथे जिथे कवी जातो तिथे त्याचे एकाकीपण त्याला साथ देत आहे. कवीचे चालणे हे रक्ताळलेल्या घोड्यासारखे आहे. त्यामध्ये घाई-गडबड नाही. तर एक संथपणा आहे. दैनंदिन जीवनाच्या चक्रात निराशेची एक खिन्न छटा कवीमध्ये दिसत आहे. कवी त्याचे मन रमेल म्हणून अनेक ठिकाणी जात आहे. पण महानगरातील कुठले ठिकाण कवीला शांत वाटत नाहीत. त्याला तिथे करमत नाही. हे शहर कवीचे प्राक्तन आहे. ते त्याला यातना देते. एकाकीपण देते. त्याची सर्वत्र भटकंती चालूच आहे पण तरीही त्याची वेदना कमी होत नाही. कवी आतून परका, एकटा, उदास असल्याची जाणीव येथे व्यक्त होते. कवितेमधून येणारे शहर हा भौगोलिक परिसर न राहता ती कवीच्या बहुपण अस्तित्वाची प्रतिमा होते. मुंबईसारख्या महानगराचा समुद्र साक्षी आहे. प्रत्येकाचे दुःख स्वतःच्या पोटात सामावून घेण्याची क्षमता या समुद्राकडे आहे. कदाचित या सगळ्या दुःखामुळे समुद्रही मंदपणे कण्हतो आहे असे कवीला वाटते. समुद्राच्या जगण्यातला एक दुःखाचा हळुवार स्वर कवीने आपल्या मनात साठवला आहे. माणसाच्या जगण्यात दुःख, वेदना, या गोष्टीचे अविभाज्य स्थान आहे. त्याना सोबत घेऊन कुठेच न थांबता कवी चालत आहे. या प्रवासात मग पुस्तकांच्या दुकानात, आर्ट गॅलरीत, बसमध्ये, फुटपाथवर कुठेच कवी थांबत नाही. त्याला कुठेच करमत नाही. एखाद्या रक्ताळलेल्या घोड्यासारखा कवी स्वतःच करमणे शोधतो आहे. हे करमणे शोधणे म्हणजेच एकाकीपणा महानगरातील तुटलेपणा दूर करण्याचा कवीचा प्रयत्न चालू आहे.

‘आपलेपण व परकेपण, आत्मीयता व परात्मता, हवेहवेसे, नकोनकोसे अशी विरोधात्मक जाणिवांची द्वंदे महानगरीय संवेदनांभोवती घुटमळताना दिसून येतात. मुंबई शहराचा इतिहास जर काटेकोरपणाने व तपशीलपूर्वक लिहिला गेला तर महानगर हे आधुनिकतेचे प्रतीक वा कोलाज कोणत्या विविधार्थांनी ठरते, याचीही काहीशी कल्पना येईल. आधुनिक मराठी कवितेत तरी महानगरीय संवेदनांचा प्रवास अद्भुतरम्यतेच्या कल्पनांपासून वास्तवतेच्या जाणिवांकडे उत्तोरत्तर होत गेल्याचे लक्षात येते. पण एवढेच नाही.’ ( पृ.२४८: जाधव रा.ग)

### ४.३.२ आख्यान :

महानगरीय संवेदनाची सर्जनशील रूपवैशिष्ट्ये डहाकेंच्या कवितेत दिसून येतात. कवितेतील 'मी' स्वतःचा शोध घेतच आहे. शहरात कवीला आक्रमणाची विविध रूपे दिसतात. कवी हा मुळं हरवलेला आणि शहरात मुळे न धरणारा आहे. हे शहर कवीचे प्राक्तन आहे. ते त्याला एकाकीपण देते. तेथे सर्वांचीच भटकंती चालू आहे. 'आख्यान' या कवितेत कवी म्हणतो -

**''घरदार नसलेल्या भटक्याप्रमाणे**
**मी हिंडतोय**
**या महानगराच्या शरीराच्या रक्तवाहिन्यांतून;**
**शोधतोय माझी हक्काची जागा,**
**घनदाट सावली असलेलं झाड.**
**माझं घर, माझं स्थान,**
**माझं अस्तित्व टेकायला दगड,**
**माझं कुटुंब, माझा समाज, माझी मूल्यं,**
**माझी मुळं, माझं पर्यावरण, माझी संस्कृती, माझा धर्म, माझा देव.''**

या महानगरातील कवीचे अस्तित्व दुखरे आहे. ज्या कालखंण्डात कवी काव्यलेखन करीत होता तेव्हा समांतरपणे सामाजिक - सांस्कृतिक क्षेत्रातही बऱ्याच घडामोडी घडत होत्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा आनंद व भ्रमनिरास, पक्षीय राजकारण, नवश्रीमंत वर्गाचा उदय, यामुळे वाढता चंगळवाद, सगळीकडे पसरणारी अनिश्चितता यांचे चित्र या कवितेतून दिसते. कवीच्याच शब्दात सांगायचे तर -

**''सगळं महानगरच झालय एक महाकाय वस्तुभांडार**
**आणि कळत नाही विकत घेतलेला कोण आणि विकणारा कोण**
**मी फक्त थुंकू शकतो.**
**आर्थिक राजकीय सत्तेच्या मदानं धुंद झालेल्या**
**प्रवक्त्यांच्या वर्तमानपत्री शब्दांवर.''**

महानगरातील वर्तमानकाळ हा लांबलेला वर्तमानकाळ आहे, असे कवी म्हणतो आहे. आपल्यातला सामान्य माणूस हा मानसिकदृष्ट्या कोसळलेला आहे. सभोवतालच्या परिस्थितीविषयी कधी कधी तो कळूनही अनभिज्ञ राहिल्यासारखा वागतो आहे आणि म्हणूनच तो भविष्यविहीन आहे. राजकीय क्षेत्रातील अंदाधुंदी, बुद्धिवादाची पीछेहाट या गोष्टी वाढतच चाललेल्या आहेत. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये विकत घेतलेला कोण आणि विकणारा कोण यातला फरकच कळत नाही. इथल्या प्रत्येक घटनेमागे कुणाचा ना कुणाचा हात असल्याचे भाकित केले जात आहे.

**'पान हलायचं झालं तरी त्यामागे एक अवाढव्य हात असतो,**
**हे मला समजलेलं आहे.**; ( पृ.३८)

'आख्यान' या कवितेचा आशय असा दीर्घ पद्धतीने विस्तारला गेला आहे. आधुनिकतावाद, उत्तरआधुनिकतावाद, देशीवादापासून देरिदा, मिशेल, मोनालिसा, फुको आणि तुकारामांपर्यंतचा परीघ कवितेत सामावला आहे. कवीला आपले घर, गाव सापडत नाही. या आधुनिकीकरणाच्या नावाखाली गावाचे रूप बदलले आहे. तिथे मोठमोठ्या इमारतींचे अतिक्रमण झालेले आहे. विकासाच्या नावाखाली माणसे देशोधडीला लागली तरी चालतील पण गाव उद्ध्वस्त करून त्याचे रूप बदलायची एक यंत्रणा येथे काम करत आहे. 'आता विकास आला की माणसं देशोधडीला' (पृ. ४१) या सारख्या ओळीतून प्रगतीचा एक नकारात्मक आलेख कवी मांडताना दिसतो.

पूर्वी दुष्काळ, पूर, लढाई, भूकंप यामुळं लोक घर सोडून जात, पण आता विकासाच्या नावाखाली होणारी अतिक्रमणे आणि त्यामुळे ओस पडणारी गावे हे चित्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दिसू लागले. नोकऱ्यांच्या शोधात महानगराकडे आलेली माणसं, मोठमोठ्या इमारती आणि त्याच्यात गुदमरलेली पृथ्वी या सर्वांचा पेच कवी इथे स्पष्टपणे मांडतो. काळ जसजसा पुढे सरकत आहे तसे तो मानवी अस्तित्व अधिक उद्ध्वस्त करत जात आहे. त्यामुळे मन तडफडते. शरीरही फणफणते. तापामुळे भ्रमिष्टासारखी अवस्था निर्माण झाली आहे. काळाशी चाललेल्या या झुंजीमध्ये कवीच्या हाताशी काहीच लागत नाही. कारण 'भाषेतून फक्त समजूत निर्माण करता येते' (पृ. ४०) अशी त्याची ठाम समजूत आहे. 'सिव्हिलायझेशन' नावाची एक कृत्रिम व्यवस्था आणि त्यामुळे हाती आलेले अपयश 'आय फेल यु टॉवरच्या' माध्यमातून कवी रेखाटतो आहे. वर्तमानपत्रांमुळे संपर्क माध्यमांच्या क्रांतीमळे माहितीचा महापूर आला पण ही क्रांती खेड्यांमध्ये पोहचलीच नाही. तिथे सर्वच कोरडे म्हणजे अज्ञानी राहिले. एका विशिष्ट वर्गापुरताच विकास मर्यादित राहिला.

या कवितेचा रूपबंध हा आख्यानक काव्यासारखा योजला आहे. 'आख्यान' म्हणजे पौराणिक इतिवृत्त आणि आख्यानक काव्य म्हणजे पौराणिक इतिवृत्ताच्या आधारे लिहलेले काव्य. या ठिकाणी दीर्घ अशा स्वरूपाचे आख्यान कवी सांगत आहे. विविध पातळ्यांवर जाऊन इतिहासातील विविध संदर्भ देऊन त्याचे वास्तवाशी असलेले नाते कवी स्पष्ट करीत आहे. काही कवितांतून कवी भूतकाळातील त्याच्या आठवणी सांगत आहे. बालपणीचे त्याचे घर, झोपाळा, पारिजातकाचे झाड त्याला आठवत आहे. पण हे सगळे आता सोबत नाही. गावातल्या घराची दुखरी आठवण घेऊन कवी शहरात पोहचला पण तिथेही दहशतीचे वातावरण असल्यामुळे तो तिथे रुजू शकत नाही. घर व शहर यांच्याही संबंधित दोन्ही आशयसूत्र या कवितेतून येतात. कवी शुन:शेपाच्या कथेच्या माध्यमातून येथील राजकीय सत्तेविषयी भाष्य करू पाहत आहे. राजाने रोहितऐवजी शुन:शेपाला बळी दिले. याचा संदर्भ कवी आजच्या सत्तासंघर्षाशी जोडतो आहे. अमानुष अशा सत्तेमध्ये कोणाचाही बळी जातो. दहशत आणि तिच्याखाली दबलेला माणूस याचे प्रतीक म्हणजे ही शुन:शेपाची कथा

आहे. कवीला ही शहरातील आक्रमणाची विविध रूपे भेडसावतात. ही आक्रमणे कवीला मृत्यूचीच आठवण करून देतात. विनाशाची सर्वव्यापी जाणीव कवीच्या मनात आहे त्यामुळे मृत्यूसूचक अशा अनेक प्रतिमा कवितेत येत राहतात. या वैफल्यग्रस्त अवस्थेत मात्र कवीच्या जगण्याकडून फार अपेक्षा नाहीत. एक घर, माझी माणसे, त्यांना जगवायची थोडी साधन इतकीच त्याची अपेक्षा आहे. या पृथ्वीला सावरून धरणारा एक जथ्थ्या दूरवर काळोखात दिवा घेऊन पुढे सरकतो आहे. हा जथ्था पृथ्वीला सावरून धरेल असा आशावाद कवी व्यक्त करीत आहे.

## ४.३.२ **खेळ :**

डहाक्यांच्या कवितेतून येणारी स्त्री ही वैशिष्टयपूर्ण आहे. 'खेळ' या त्यांच्या कवितेतून 'खेळ' खेळणाऱ्या मुली आपल्यापुढे उभ्या राहतात. या कोणता खेळ खेळतात हे कवी आपल्यापुढे आणत नाही. कधी तो साधा रोजच्या मनोरंजनाचाच भाग असेल, पण तो खेळ अतिशय सोपा आहे त्यांचे एक साधे गाणे आहे. या गाण्यात ज्याला जेव्हा जे हवे ते हव्या त्या रंगाचे, हव्या त्या वासाचे फुल घेण्याचे स्वातंत्र आहे. या खेळातील मुली मुक्तपणे हा खेळ खेळत आहेत. विविध फुले एकमेकीला देऊन त्या हा खेळ खेळत आहेत. पण त्यांना कोणीतरी भुवया चढवून दटावत आहे. गुरकावणी दाखून गप्प बसवत आहे आणि त्यांचा खेळ त्यामुळे बंद होतो आहे. आपल्या समाजात स्त्रियांच्या वाट्याला जे दुय्यम स्थान आले आहे; त्याचे चित्रण इथे प्रतीकात्मरीतीने आलेले आहे. प्रत्यक्षात जगत असताना या मुली अतिशय मुक्तपणे जगत आहेत. पण त्यांच्यावर विविध बंधने घातल्यामुळे त्या आपले जगणे हरवून बसल्या आहेत. त्यांच्यावरील बंधनामुळे त्यांच्याच आयुष्याचा एक खेळ झाला आहे असे कवी म्हणतो.

या मुलींना जगत असताना त्यांचे स्वत्व गवसले. पण त्यांच्यावरील बंधने, त्यांना घातलेली भीती यामुळे त्या आपले सामर्थ्य पूर्ण ताकदीनिशी वापरू शकत नाहीत. स्त्रियांच्या ठिकाणी असणाऱ्या सर्जनशील वृत्तीमुळे नवनिर्माणाच्या अनेक शक्यता निर्माण होतात. पण इथे त्याच्या व्यक्त होण्यावरच बंधने घातली जात आहे. पुरुषप्रधान संस्कृतीचा एक पगडा येथील समाजव्यवस्थेवर नेहमीच राहिला आहे. कदाचित याचाच एक भाग म्हणून दटावणे मुलींच्या वाट्याला येत आहे. सुरुवातीचा मुलींचा चालू असलेला 'खेळ' त्याच्या आयुष्याचा 'खेळ' होण्यात कसा बदलतो हे कवी अत्यंत सहजपणे दाखवून देत आहे.

## ४.३.२ **पुतळे :**

'पुतळे' सारख्या कवितेतून कवी समांतर अशा सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचे चित्रण करीत आहे. समाजाची वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय प्रतीके म्हणून पुतळ्यांना महत्वाचे स्थान आहे. प्रत्येक समाज त्या पुतळ्यांच्या माध्यमातून आपापली अस्मिता जपत असतो. ज्या व्यक्तींनी समाजात उल्लेखनीय असे काम केले त्याच्या कामाचा गौरव म्हणून पुतळे उभे केले जातात. माणूस त्याच्या सोयीनुसार पुतळे उभे करतो. त्यांचा गौरव करतो. त्यांना हार घालतो. त्यांच्या कृतीचे समर्थन करतो आणि या कृतीचे समर्थन न करणाऱ्या व्यक्तींना विरोधक ठरवून एका पिंजऱ्यात घातले जाते. त्यांना फक्त त्यांचे समर्थक हवे असतात. त्यामुळे कधी

कधी वर्चस्व गाजवणाऱ्या भूमिकेतून पुतळे उभे केले जातात असे कवीला वाटते. ज्या गटाची सत्ता असते तो गट त्या व्यक्तीच्या समर्थनार्थ पुतळे उभे करतो. पुतळे उभे करणाऱ्या व्यक्तीचा इतिहास, त्याचे कष्ट त्याने पणाला लावलेली कला या बद्दल कधीच बोलले जात नाही. शिवाय ज्या कारणांनी हे थोर विभूतींचे पुतळे उभे केले जातात, त्यामागचा इतिहास जाणून घेण्याचा कोणीच प्रयत्न करीत नाही. कधी कधी हा इतिहास सोईस्करपणे दडपला जातो. जगभरात चाललेल्या सांस्कृतिक संघर्षावर ही कविता भाष्य करते. माणूस स्वतःचाच इतिहास कसा विसरतो, याचे चित्रण या कवितेतून केले आहे. 'पुतळे' ही कविता वाचताना आपल्याला कुसुमाग्रजांच्या पुतळ्यांविषयीच्या कवितांमधील चिंतन, नाट्यात्मकता, आठवते. कुसुमाग्रजांच्या कवितेतील उपरोध येथे आहेच पण त्यांच्या शैलीचीही आठवण येते.

कवितेविषयी या लेख संग्रहात डहाके यांनी आपल्या कवितेविषयी एक महत्त्वाची नोंद केली आहे. 'अनेक अंतर्विरोधी वृत्तीप्रवृत्तींनी वेढलेल्या वर्तमानकाली वास्तवात जगताना होणारी सर्वसामान्य माणसाची घुसमट आणि विश्वाच्या तर्कहीन पसाऱ्यात हिंडताना व्यक्तीला पडणारे प्रश्न हे वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेच्या मुळाशी असलेले सूत्र आहे.' (डहाके:पृ २४४) समकालीन वास्तवाचा भीषण चेहरा डहाकेंच्या कवितेतून बघायला मिळतो.

### ४.३.२ वास्तववाद :

'वास्तववाद' या कवितेतून समकालीन राजकारणाचा अधःपात, लोकशाहीच्या नावावर सुरु असणारी मुस्कटदाबी, राजकीय पक्ष यांची महत्वाकांक्षा यांचे चित्र पहायला मिळते. वर्तमानाचे भयावह वास्तव चिमटीत पकडत कवी भविष्याचेही सूचन करतो आहे.

उदा.

**''जी बीजं पेराल ती, तशी पिकं निघतात.**
**तिरस्कार, घृणा, हिंसा यांची बीज पेराल तर**
**रक्तानं रंगलेल्या पिकांची कापणी करावी लागेल**
**आणि खळ्यात तुडवल्या जातील उद्ध्वस्त वस्त्या.**
**अस्सल अंकुरांना, रोपांना खाऊन टाकणारं**
**भ्रष्ट विचाराचं तण माजत चाललं आहे**
**आणि खुरपणी करताना तण नव्हे तर**
**धान्याचे कोवळे कोंबच खुडले जात आहेत.''**

या ठिकाणी 'जशाच तसे' या न्यायाने घृणेच्या पोटी घृणाच जन्माला येईल. हिंसेचे बीज रक्तात रंगलेले पीकच देईल. द्वेष, वैर यांच्या पोटी द्वेष, वैरच जन्माला येईल. हे वास्तव सांगितले आहे. अभिव्यक्ती आणि वैचारिक अंगाने डहाकेंच्या कवितेमध्ये जी अनेक स्थित्यंतरे झाली, त्याचा पुढचा टप्पा म्हणून कवितेतील काव्य जाणिवांचा विचार करता येतो. आज सगळीकडे द्वेषाचे राजकारण सुरु आहे. माणूस एकमेकांचा

तिरस्कार करीत आहे. हिंसेतून हिंसाच निर्माण होत असते. हे कटू वास्तव कवी सांगत आहे. पुढच्या पिढीने कसे वागायचे हा निर्णय त्या पिढीनेच घ्यायचा आहे. या पिढीचे चांगले विचार धान्याच्या कोवळ्या कोंबाप्रमाणे खुडण्याचा प्रयत्न चालूच आहे. त्यामुळे 'फड्या निवडुंगाचे रान' ही प्रतिमा विचारशून्य अशा मानव समूहासाठी वापरली जात आहे. या पिढीने चांगले विचार पुढे नेणे ही मोठी कसरत आहे . एक प्रकारचा विस्तवच या पिढीला पुढे न्यायचा आहे. या विस्तवाचा वापर करून अन्न शिजवायचे की घर जाळायचे हा निर्णय सर्वस्वी या पिढीवर अवलंबून आहे . विस्तवाचा वापर करून अन्न शिजवणे किंवा घर जाळणे या कृती कवी प्रतीकात्मक पद्धतीने सांगत आहे. चांगल्या विचारांच्या माध्यमातून सकारात्मक कृती नवीन पिढीकडून कवीला अपेक्षित आहे.

## ४.४ सारांश :

विसाव्या आणि एकविसाव्या शतकातील माणसाच्या जगण्यातील व्यथा,घुसमट त्याच्या मनाचा कोंडमारा डहाकेंच्या कवितेतून पुढे येतो. कवी आपल्या कवितेतून युगाविषयीचे वास्तव व्यक्त करतो. ही कविता विसाव्या शतकाचे दुःख आपल्या कवेत घेते, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. सामूहिक आणि सार्वत्रिक अध:पतनाविषयी ही कविता भाष्य करते. लोकशाही व्यवहारांना आलेले हुकूमशाहीचे स्वरूप, सामान्यांची ससेहोलपट, त्यांच्या पदरी आलेली निराशा याचे चित्रण या कवितेतून येते. वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेतून येणारी प्रतिमा सृष्टी विलक्षण आहे.कवितेतील सुटी सुटी वाक्ये वाचकांच्या वैचारिकतेला आवाहन करतात. नव्या आशयपूर्ण प्रतिमा, प्रतीकांचा वापर येथे कवी करतो.मुक्तछंदातील या कविता गद्यात्मक स्वरूपाच्या आहेत.

## ४.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

१. वास्तववाद - ज्ञानाचा विषय होणाऱ्या भौतिक वस्तूंची सत्ता ज्ञातृनिरपेक्ष,मनाच्या अवबोधनाची किंवा चित् ची अपेक्षा नसलेली अशी असते, असे मानणारे तत्त्वज्ञान म्हणजे वास्तववाद.

२. शनु:शेप - ऐतरेय ब्राह्मण मधील एक नाव

३.उत्तरआधुनिकवाद - विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील कला,वास्तुकला, साहित्य व समीक्षा या क्षेत्रातील एक संकल्पना आणि शैली. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील कला,वास्तुकला,साहित्य व समीक्षा या क्षेत्रातील एक संकल्पना आणि शैली.दुसऱ्या महायुद्धानंतरच्या (१९३९-४५)कला साहित्याचा निर्देशही काही वेळा या संज्ञेने केला जातो. समाजात विचाराच्या आणि अनुभवाच्या सामान्यतः स्वीकारल्या गेलेल्या पद्धतीना धक्का देवून अस्तित्वाची निरर्थकता जाणवून देणे, तद्वतच आली तथाकथित सुरक्षिततेची भावना ज्यावर लटकलेली त्या खुंट्यांचा पोकळपणा दाखवून देणे, अशी उद्दिष्टयेहि उत्तर - आधुनिकतावादी साहित्याच्या निर्मितीमागे काही वेळा दिसून येतात.

## ४.६ स्वयंअध्ययन प्रश्न आणि उत्तरे :

**अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मुंबई हे महानगर कवीला कोणासारखे भासते?

२) गर्दीत,रस्त्यावर,जिथे कुठे जाईल तेथे कवीच्या मागून कोण येते?

३) 'खेळ' या कवितेत मुलींना कोणते स्वातंत्र्य आहे?

४) 'पुतळे' ही कविता नेमकेपणाने कशावर बोट ठेवते?

५) काटेरी रानातून काय घेऊन जायचे आहे?

**स्वयंअध्ययनांची उत्तरे :**

१) मुंबईसारखे महानगर कवीला समुद्रासारखे विशाल, घोड्यासारखे गतिमान भासते.

२) गर्दीत, रस्त्यावर, जिथे कुठे जाईल तेथे कवीच्या मागून समुद्र येते.

३) 'खेळ' या कवितेत मुलींना हव्या त्या रंगाचे,हव्या त्या वासाचे फुल घेण्याचे स्वातंत्र्य आहे.

४) 'पुतळे' ही जगभरात पुतळ्यांच्या माध्यमातून सुरु असलेल्या प्रतीकांच्या विकृत राजकारणावर नेमकेपणाने बोट ठेवते.

५) काटेरी रानातून वास्तववादाचा विस्तव घेऊन जायचा आहे.

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेची वैशिष्टये कोणती?

२) लघुअनियतकालिकांमधून काव्यलेखन करणाऱ्या कवींची ओळख करून द्या.

३) महानगरीय कवितेची वैशिष्ट्ये थोडक्यात लिहा.

४) वसंत आबाजी डहाके यांच्या 'वास्तवववाद' या कवितेचे स्वरुप स्पष्ट करा.

५) वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेतून येणाऱ्या प्रतिमांविषयी थोडक्यात लिहा.

**ब) लघुत्तरी प्रश्न.**

१. महानगरीय संवेदनांची विविध रूपे वसंत आबाजी डहाकेंच्या कवितेतून कशा पद्धतीने दिसून येतात ते लिहा.

२. 'पुतळे' या कवितेचा आशय थोडक्यात लिहा.

३. 'आख्यान' या कवितेची शैली कशा प्रकारची आहे स्पष्ट करा.

४. 'खेळ' या कवितेतील मुलींना का दटावले जात आहे?

## ४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१. मराठी विश्वकोश, वास्तववाद (नोंद) खंड १, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई (१९७६)

२. डहाके वसंत आबाजी, कवितेविषयी, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद (१९९९) पृ.२४४

३. जाधव. रा. ग : साठोत्तरी मराठी कविता व कवी, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

४. कुलकर्णी तु. शं. (संपा) : स्वातंत्र्योत्तर मराठी कविता १९६१-८०, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, (१९९४).

❑❑❑

घटक ३

# अजीम नवाज राही आणि कल्पना दुधाळ यांची कविता

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ अजीम नवाज राही यांची कविता

  ३.२.२ कल्पना दुधाळ यांची कविता

३.३ शब्दार्थ व टीपा

३.४ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे

३.५ संदर्भ सूची

## ३.० उद्दिष्ट्ये :

विद्यार्थी मित्रांनो !

या घटकात आपण अजीम नवाज राही आणि कल्पना दुधाळ या नव्वदोत्तरी कवींच्या कवितांचा अभ्यास करणार आहोत. हा अभ्यास करताना आपण खालील उद्दिष्ट्ये ठरवली आहेत.

- कवी अजीम नवाज राही यांच्या कवी व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणे.
- कवी अजीम नवाज राही यांच्या कवितांची आशयसूत्रे शोधणे.
- कवी अजीम नवाज राही यांच्या कवितेतून प्रकटणाऱ्या मुस्लीम समाज-संस्कृतीचा शोध घेणे.
- कवी अजीम नवाज राही यांच्या कवितेशी शैली आणि प्रतिमासृष्टी यांचा शोध घेणे.
- कवयित्री कल्पना दुधाळ व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणे.
- कवयित्री कल्पना दुधाळ यांच्या कवितांची आशयसूत्रे शोधणे.
- कवयित्री कल्पना दुधाळ यांच्या कवितेतून प्रकटणाऱ्या ग्रामीण संस्कृतीचा शोध घेणे.
- कवयित्री कल्पना दुधाळ यांच्या कवितेशी शैली आणि प्रतिमासृष्टी यांचा शोध घेणे.

## ३.१ प्रस्तावना :

विद्यार्थी मित्रांनो !

मराठी कवितेत १९९० हे वर्ष आणि त्यानंतर आलेली कविता खूप महत्त्वाची आहे. या वर्षापासून भारतात जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. आपल्या भारताची व्यापारपेठ जगासाठी खुली झाल्याने एकूणच भारताचे अर्थकारण बदलून गेले. वस्तुविक्री व खरेदीसाठी जग हेच मोठे खेडे झाले. थेट संपर्क, इंटरनेट, आयात-निर्यातीची सैल झालेली बंधने यांमुळे जगाच्या कानाकोपऱ्यातली वस्तू सहज आपल्या दारात उपलब्ध झाली. त्याचे सांस्कृतिक-सामाजिक परिणामही घडून आले. माणसाचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण निव्वळ उपभोगवादी, वस्तुवादी झाला. समाजात चंगळवाद फोफावला. वापरा आणि फेका हे तत्त्व रूजू लागले. आधी आपण बाजारात गरजेच्या वस्तू घेण्यासाठी जात होतो, आता बाजारात वस्तू आधी आल्या आणि त्यांच्या गरजा निर्माण केल्या गेल्या. यासाठी टीव्ही- इंटरनेट सारखी प्रभावी माध्यमे वापरून जाहिरातींचा मारा करण्यात आला. सेल आणि महोत्सवाचे पेव फुटले.

या साऱ्यांचा परिणाम आपल्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनावर झाला. आपली जीवनशैली बदलली. खाद्य संस्कृती, पेहराव, प्रवास, सण-समारंभ, बचत, खर्च, भेटवस्तू देणे-घेणे या बाबतचा आपला मूल्यविषयक दृष्टिकोण बदलून गेला. आर्थिक व्यवस्था बदलल्याने सामाजिक संबंध यांतही प्रचंड उलथापालथ झाली. कुटुंबे विभक्त होऊ लागली. रोजगारासाठी खेड्यातून शहरांकडे स्थलांतर होऊ लागले. त्यातून असुरक्षितता वाढली व प्रांतवाद, जातीयवाद, धर्मांधता बोकाळली. तात्पर्य, अशा सांस्कृतिक बदलांमुळे; कवीच्या संवेदनशील मनाला हादरे बसत गेले. त्यातून त्यांची प्रतिक्रिया व त्यांचे भाष्य या अगोदरच्या मराठी कवितेपेक्षा वेगळे ठरले.

अशा नव्वदोत्तर कवितेत अजीम नवाझ राही आणि कल्पना दुधाळ हे दोन कवी महत्त्वाचे आहेत. विशेष म्हणजे हे कवी दोन वेगळ्या साहित्य प्रवाहाचे प्रतिनिधित्व करणारे कवी आहेत. राही मुस्लीम तर दुधाळ ग्रामीण समुदायाची जाणीव साकारत आहेत. जागतिकीकरणाच्या कोलाहलातील मुस्लीम आणि ग्रामीण समुदायाचे हे अस्वस्थ वर्तमान प्रकटत असल्यामुळे या कवितांचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

## ३.२ विषय विवेचन :

विद्यार्थी मित्रांनो ! आपण अजीम नवाज आणि कल्पना धुमाळ यांच्या कवितांचा अभ्यास करणार आहोत. सुरुवातीला आपण अजीम नवाज राही यांचा परिचय, त्यांच्या कवितेचे स्वरूप आणि त्यांची भाषाशैली यांचा अभ्यास करूया.

### ३.२.१ अजीम नवाज राही यांची कविता :

**◆ कवी परिचय :**

अजीम नवाज राही (इ.स. १९६५) यांचा जन्म साखरखेर्डा, तालुका सिंदखेडराजा, जिल्हा बुलढाणा येथे झाला असून त्यांचे इयत्ता सातवीपर्यंतचे शिक्षण साखरखेर्डा (जि. बुलडाणा) या गावी उर्दू माध्यमातून झाले. त्या गावात पुढील शिक्षणासाठी उर्दू माध्यम उपलब्ध नसल्याने राही यांना इयत्ता आठवीमध्ये मराठी माध्यमात प्रवेश घ्यावा लागला. इयत्ता दहावीत मराठीत नापास झाल्यामुळे पुढे त्यांनी शिक्षण सोडले. (आश्चर्य म्हणजे पुढे दहावीच्याच मराठीच्या पुस्तकात राही यांच्या कवितेचा समावेश झाला.) सध्या ते पैनगंगा सहकारी सूत गिरणी येथे जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

राही यांचे व्यवहाराचा काळा घोडा(२००४), कल्लोळातला एकांत (२०१२) आणि वर्तमानाचा वतनदार (२०१७) हे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध असून त्यांच्या कवितांचे इंग्रजी तसेच हिंदी भाषेतही अनुवाद झाले आहेत.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावीच्या मराठी पुस्तकात त्यांच्या 'दुष्काळ' नंतर 'पडझड' या दोन कवितांचा समावेश केला आहे. शिवाय गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती यांच्या अभ्यासक्रमातही त्यांच्या कवितांचा समावेश केलेला आहे.

राही यांना आजवर महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार, यशवंतराव चव्हाण पुरस्कार, शरदचंद्र मुक्तिबोध काव्यपुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा कवी केशवसुत पुरस्कार इत्यादी मानाचे पुरस्कारही लाभले आहेत.

**◆ अजीम नवाज राही : वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व आणि कवितेतील आशयविश्व :**

मित्रांनो, अजीम नवाज राही यांचा परिचय आणि त्यांच्या कवितेच्या अभ्यासाची उद्दिष्ट्ये पाहिल्यानंतर आता आपणाला त्यांचे कवी म्हणून असलेले व्यक्तिमत्त्व आणि त्यांच्या समग्र काव्यातील आशयविश्व पाहूया. समाजातल्या आजवर अलक्षित राहिलेल्या मुस्लीम जग, मुस्लीम मोहल्ला, मुस्लीम समाजमन अशा दुर्लक्षित अभिव्यक्तीला नव्वदोत्तरी मराठी कवितेत आणण्याचे मोठे काम राही यांच्या कवितेने केले आहे. एक सामाजिक

शोध त्यांच्या कवितेत आहे. शिवाय अंजली कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे, ''त्यांच्यात कविता आणि मी असा शोधही आहे. कवितेनं आयुष्याला आकार नि अर्थ दिल्याचा कृतज्ञ भाव तर त्यात आहेच; शिवाय कवितेसोबतच्या आयुष्याचं उत्खननही त्यात दिसून येतं.'' (अंजली कुलकर्णी : लोकसत्ता, १५ एप्रिल, २०१८) म्हणजे भोवतालचा समाज आणि आपल्या कवी व्यक्तिमत्त्वाचा शोध हे त्यांचे कवी म्हणून वैशिष्ट्य आहे. अजीम नवाज यांच्या कवितेतले विश्व हे कष्टकरी समूहाचे आहे. त्यांची कविता बाहेरचे रमवणारे जग आणि मोहोल्ल्यातले भेसूर वास्तव जग यातले विदारक अंतर दर्शवते. त्यांच्या मोहोल्ल्याची दुनिया वेगळी असून त्याला कवितेबिवितेशी काही देणेघेणे, सोयरसुतक नाही; तर तिथे केवळ जगण्यासाठी सुरू असलेला संघर्ष आहे. या मोहल्ल्यातील लोकांना नेत्यांचा, पुढाऱ्यांचा, कवितेच्या क्षेत्रात समारंभ आयोजित करणाऱ्यांचा, समारंभाच्या पाहुण्यांचा, गर्दीचा, श्रोत्यांचा.. सर्वांचा अनुनय करता करता हाती शून्य आल्याची, एकाकीपणाची भावना अजीम नवाज यांच्या कवितेत व्यक्त होत जाते. अल्पसंख्यांक असल्यामुळे बहुसंख्यांकांच्या समूहात जगताना येणारी असुरक्षितता व दहशत हे विषय सुद्धा राही यांच्या कवितेत येत राहतात.

◆ **अजीम नवाज राही यांच्या कवितेची आशयसूत्रे :**

मित्रांनो,आशयसूत्रे म्हणजे कवीच्या कवितेतून आशयात कोणकोणते विषय आलेले आहेत, त्याची सूत्रबद्ध केलेली मांडणी होय. आता अजीम नवाज राही यांच्या अभ्यासक्रमातील कवितांतील आशयसूत्रे पाहणे गरजेचे आहे. आपल्या अभ्यासक्रमात राही यांच्या तिन्ही कवितासंग्रहातील दुष्काळ: काही दाहक संदर्भ, जातीय दंगल: १२ भानगडींची १३ वळणे, सुरक्षेची हमी देणारा कळपवाद, मोडतोडीतून डागडुजीची भाषा शिकताना; मोहल्ला, पक्षी आणि कातरवेळ या पाच कविता नेमलेल्या आहेत. या कवितांमधून दुष्काळग्रस्तांचे दु:ख; जातीय दंगलीची झळ पोचलेल्या प्रचंड दडपणाखाली जगणाऱ्या समाजाची वेदना,जातिधर्माच्या नावाखाली दुर्बलांवर दहशत गाजवणारे समूह, सामाजिक व भाषिक मोडतोडीतूनही कवितेचा होणारा जन्म, दंगलीमुळे निर्वासित झालेली वस्ती व तिच्यातील नष्ट झालेली भूतदया - ही आशयसूत्रे राही यांच्या कवितेत दिसतात.

डॉ. एकनाथ पाटील यांच्या मते, ''धर्मांध आणि जातीय विद्वेषाच्या वातावरणात जाणीवपूर्वक धूसर बनवली जात असलेली 'भारतीय' ही ओळख अजीम यांची कविता प्राणपणाने जपू पहाते. या कवितेची मुळं अस्सल देशी आहेत. हिंदू-मुस्लीम संस्कृतीच्या समन्वयाची परंपरा ही कविता अभिमानाने मिरवते.'' (एकनाथ पाटील, प्रस्तावना, काव्यगंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ.२८)

**दुष्काळ : काही दाहक संदर्भ** या कवितेत सुक्या दुष्काळामुळे झालेली गावाची दुरावस्था चित्रित केली आहे. करपलेले गवत, आटलेल्या विहिरी, रानातून आलेल्या उपाशी गायी, त्यामुळे वासरांचे रात्रभर हंबरणे अशी गावाची अवस्था होते. घरे उदासवाणी आणि वस्त्या प्रश्नांकित होत जातात. मंदिरातील प्रार्थनेच्या पार्श्वभूमीवर म्हाताऱ्याकोताऱ्यांच्या गप्पांत भाकरीचाच विषय येत राहतो. उपाशी उंदरांचा धान्याच्या पेवात धुडगूस सुरू होतो आणि लहान मुलांचा येरे येरे पावसा म्हणतानाचा उत्साह कुठल्या कुठे दूर पळून जातो.

हडकुळा शेतकरी शेताच्या बांधावर नुसता बसून राहतो, रानातून पाखरे पसार होतात; रात्री वटवाघुळांची गर्दी वाढत जाते. सुख समृद्धीचे भविष्य सांगू पाहणाऱ्या ज्योतिषाचाही आवाज खोल जातो. असे दुष्काळाचे दारुण चित्र कवितेत रेखाटले आहे.

'**जातीय दंगल : १२ भानगडींची १३ वळणे**' या कवितेत जातीय दंगलीच्या आधीचे व दंगलीनंतरचे वातावरण टिपलेले आहे. दंगलीच्या आधी बहरलेल्या समाजाच्या झाडांचा मोहोर झडू लागतो. समाजात पूजनीय असलेल्या प्रतीक-प्रतिमांचा विध्वंस जाणीवपूर्वक घडवून आणला जातो. मेंदूत कळकट विचार पेरले जातात आणि धार्मिक घोषणांच्या गोंगाटात मानवी भावविश्वाला हादरे देणारा अविवेकी मळवट माखला जातो. दंगलीत समाजाची सौहार्दपूर्ण भाषा बदलते.आवेगाच्या किंकाळ्या,अख्खे गाव दहशतीने पोखरले जाते. समाजातील समन्वयाच्या, एकोप्याच्या परंपरा दुबळ्या होत जातात आणि अफवांची अदृश्य सुरी मानेवर फिरू लागते. विसंवादी रक्त भळभळते चांगुलपणा बाजूला पडतो, समूहांची भाषा आक्रमक बनत जाते. एका रात्रीत गावाला फाटाफुटीचा शाप लागतो आणि आजवर शांत असलेले गाव सालोसालच्या तंटा-बखेड्यात ओढले जाते. कुटिल कारस्थाने, अफवांची घाण, मूर्खपणाची वावटळ वाढत जाते. गावाला पोलिसांचा गराडा पडतो. हल्लागुल्ला, पळापळ,आरडाओरडा, सायरनचे आवाज, पकडापकडी सुरू होते. धार्मिक द्वेष निर्माण करून मुद्दाम सामाजिक वातावरण बिघडवून धार्मिक दंगली कशा घडवल्या जातात, ते या कवितेत अचूकपणे टिपले आहे.

असे वातावरण पाहून कवी अस्वस्थ होत जातो. आपण आजवर नुसत्याच सामाजिक कविता लिहिल्या त्या फाडून टाकाव्यात की आपणही दगडफेकीत सामील व्हावे अशी त्याची तीव्र प्रतिक्रिया होते. कवी असला तरी तो एक सामाजिक माणूसच आहे, हे भान कवी येथे व्यक्त करतो. मात्र हे सारे निवळल्यानंतर पुन्हा शांतता निर्माण होईल असा आशावादही शेवटी कवी व्यक्त करतो. त्यासाठी कवी मंदिरावरच्या कबुतराचा थवा मशिदीच्या घुमटावर येऊन विसावतो, अशी प्रतिमा वापरतो.

'**सुरक्षेची हमी देणारा कळपवाद**' या कवितेत सुरक्षिततेसाठी प्रत्येक समाज कसा आपल्या जातीच्या कळपात आसरा शोधतो, ते सांगितले आहे. कळप सापडल्यावर संपते शोधयात्रा, अवघडलेली कामे तडीस नेण्यासाठी लागू पडते आडनावांची मात्रा असे समाजाचे वर्तन असते. एकीकडे असे सजातीय आहेत, तर दुसरीकडे दुसऱ्या जातीचा तीव्र द्वेष करणारे स्वत:च्या जातीच्या तलवारी उपसून जातीसाठी आंधळे झालेले जात्यंधही आहेत. वृत्तपत्रे आणि वाहिन्या तर उलट अशा जात्यंधांना चर्चेला बोलावून पूर्वग्रह पसरवण्याची संधी देतात. अशी जातींची घालमेल बघताना कवीही अस्वस्थ होतो, श्वासांशी असलेली बांधिलकी तुटते आणि शब्दांशी फटकून वागण्याचा त्याचा निर्णय होतो. त्यातूनच हे जगणे आपले आहे, की आश्रयदात्यांचे ते तरी ठरावे असे कवीला वाटते. समाजकंटकांना मात्र यांच्याशी काहीही देणेघेणे नसते. ते धर्माचा खेळ खेळू लागतात आणि बहुसंख्य अल्पसंख्यांकाला छळू लागतात. हे सारे सुरक्षिततेच्या साठी तयार झालेल्या कळपवादामुळे घडून येत असते असे कवी म्हणतो. समूहमनाच्या आंतरिक प्रक्रियांमागील मानसशास्त्रीय मीमांसा कवी येथे करतो.

**'मोडतोडीतून डागडुजीची भाषा शिकताना'** या कवितेत गावातील सामाजिक वातावरण दूषित झाल्यामुळे अस्वस्थ झालेल्या कवीचे मनोगत आले आहे. पूर्वीसारखी भुकेल्याला आपल्या गाठीची शेव देणारी माणसे, सौजन्य आता गावात राहिले नाही. शेतशिवार, वेशी, घरदार- सारे गैरसमजाने भरलेले असून संवादात पासंगभर जिव्हाळा राहिला नाही. सूडाच्या जखमांवर खपल्या धरल्या जात नाहीत. गावात गटतट, प्रतिशोध, खुन्नस आहे आणि हे कवीच्या आवाक्यापलीकडील आहे. उलट कवी आणि त्याचे घर गावाच्या षडयंत्राच्या केंद्रस्थानी आहे. त्यातून मी जखमच झालो आणि जखमा माझ्या झाल्या अशी कवीची भावना होते.

आणखी वाईट हे की, मोहल्यात काळजीने विचारपूस करणारेच कवीविरूद्धच्या प्रत्येक कटात सामील असतात. तोंडावर गोड बोलतात अन् माघारी हल्ला चढवतात, असे त्यांचे वर्तन असते. तरीही कवी काही निषेध करीत नाही. कारण उत्पन्नाची सर्व साधने या बहुसंख्य लोकांच्या हातात असल्याने त्यांच्या साधनासमोर नमते घ्यावे हा समजुतदारपणा तो पाळतो. अशा वातावरणात कवीच्या दोन भाषा-मातृभाषा उर्दू व व्यवहार भाषा मराठी आणि दोन संस्कृतीही मुस्लीम व हिंदू इतरांच्या कौतुकास पात्र होत नाही. मात्र असे उन्मळून पडल्यावरही याच अस्वस्थतेतून कवीच्या पदरात कवितेची देणगी पडते. मोडतोडीनेच शिकवली डागडुजीची कला अशी त्याच्या कवितेच्या निर्मितीची प्रक्रिया सांगितली आहे. त्यामुळे कवितेचा पाया भक्कम होतो, कविता कल्पनाविलासी न होता वास्तववादी होत जाते, असे कवीचे मनोगत येथे आले आहे.

**'मोहल्ला, पक्षी आणि कातरवेळ'** या कवितेत पशुपक्ष्यांबद्दल भूतदया बाळगणाऱ्या गावात दंगलीनंतर कसा विपरीत बदल होतो त्याचे चित्रण आले आहे. गावातील वाड्यात आधी 'दिवसभर, पाखरे, चिमण्या, साळुंकी, कावळे, वेगवेगळे पक्षी, पोपटांचा थवा' येत असतो आणि त्यांच्या किलबिलाटांनीच कवीचे खडकाळ जगणे आणि कविता ओलसर म्हणजे निर्मितिशील होते. शांततेची कबुतरे अजानच्या पार्श्वभूमीवर अंगणात दाणे टिपायला लागतात, तेव्हा कवीचे मन अल्लाशी जवळीक साधू लागते.

म्हणजे ईश्वराशी एकरूप होण्यासाठीही सामाजिक सौहार्द आणि जंगलावाचनाची म्हणजे निसर्ग-पक्षी यांच्याशी संवादी राहण्याची गरज असते, असे कवीला सुचवायचे आहे. उपाशी कावळ्याला चतकोर भाकरीचा तुकडा देणे आणि जखमी साळुंकीच्या पावलाला लेकरू समजून मलम लावणे अशा भूतदयेच्या संस्कारातूनच इतर समाजातील माणसांशीही सहिष्णुतेने वागण्याची प्रेरणा निर्माण होते आणि तीच ईश्वर-अल्लाच्या जवळ जाण्याची, त्याला प्रिय होण्याची पायरी आहे, असे कवीला सुचवायचे आहे. परंतु माणूस मतलबी आहे. तो षडयंत्र रचून, जंगलसंस्कृतीचे नियम धाब्यावर बसवून सावज हेरतो, प्राण्यांचीही शिकार करतो आणि माणुसकीचीही हिंसा.

प्राणिमात्रांच्यावर प्रेम आणि मानवी सहिष्णुता हाच अल्लाच्या कृपेचा मार्ग असल्याने एक फकीर खाटकाकडून हाडके गोळा करून स्वत:साठी डाळरोटी नाकारून दर्ग्यातील कावळ्यांना खाऊ घालतो आणि उरलेले तुकडे मोकाट कुत्र्याला देतो. या साध्या कृतीतून दर्ग्यात दातृत्वाला उधाण आणि आग्रहाला भरती येत जाते; पण दंगल घडते आणि सारेच बदलते. दंगलीत दयाळू फकिराचा जीव गेल्यावर दर्ग्यातल्या झाडांवर

कावळे दिवसभर नुसते बसून राहतात आणि नंतर तिकडे फिरकतही नाही. केवळ माणूसच नव्हे तर पाखरेही पोरकी होतात. त्यामुळे गावात आता पूर्वीसारखे कावळे येत नाहीत. पोपट, बगळे आणि चिमण्याही हद्दपार होतात; कारण दंगलीनंतर गावाच्या दातृत्वाला ओहोटी लागलेली असते. इकडे गावालाही डिजिटल शहरांची ओढ लागते. सहिष्णू, उदार अशा गावाची दंगलीनंतर एकूण संस्कृतीच बदलते. गावाला शहराच्या डिजिटल संस्कृतीची ओढ निर्माण होते. नागरिकरणाच्या व आधुनिकतेच्या रेट्याने सामाजिक विसंवाद वाढतो आणि सहिष्णुता धोक्यात येते, हे कवीने दाखवले आहे. मात्र सारेच काही बदलले नाही. अजूनही कवीला आशा आहे; पाळलेला पोपट मरण पावल्यावर आयुष्यभर फलाहार नाकारणारा एक बुजुर्ग गावात असून तो अजूनही पाखरांच्या आणि रानावनांच्या कहाण्या सांगत असतो; तेव्हा मोहल्ल्यातली कातरवेळ आसवांत चिंब भिजते असे कवीला वाटते.इथेही कवितेचा शेवट कवी आशावादी पद्धतीने करतो.

अशा प्रकारे अजीम नवाज राही यांच्या कवितेच्या आशयसूत्रांचे विवेचन करता येते.

◆ **अजीम नवाज राही यांची भाषाशैली :**

विद्यार्थी मित्रांनो, आशयाचा विचार केल्यानंतर आता आपल्याला कवी अजीम नवाझ राही यांच्या कवितेच्या शैलींचा अभ्यास करावयाचा आहे. कवितेची शैली ही कवितेतून प्रकटणाऱ्या भाषेतील शब्द व प्रतिमा यांच्या आधारे शोधता येते. आपण व्यवहारात जी भाषा वापरतो तिचा हेतू, संवाद आणि व्यवहार पूर्ण करणे हा असतो. त्यामुळे त्यातील वाक्यांच्या व शब्दांचा अर्थ एक आणि एकच अभिप्रेत असतो. 'मला कोल्हापूरची दोन तिकिटे द्या' या वाक्याचा एकच अर्थ प्रकटल्याशिवाय कंडक्टर व प्रवासी यांतील व्यवहार पूर्ण होणार नाही. उलट 'एक तुतारी द्या मज आणुनि' या केशवसुतांच्या ओळीत केवळ तुतारी आणून देणे एवढाच अर्थ नाही. इथे तुतारीचा विशिष्ट प्रकारचे वाद्य एवढाच अर्थ नाही, तर समाजातील भेदाभेद, परंपरा-रूढी यांची बंधने, स्वातंत्र्याचा संकोच, समतेचा अभाव मला मान्य नसून त्या विरुद्ध कवी मला सांस्कृतिक युद्ध पुकारायचे आहे असा व्यापक आहे. ही अर्थाची व्यापकता कवितेत शब्दांच्या प्रतिमांमुळे येते. म्हणजे कवितेतील भाषा कवितेत व्यवहारातील शब्दांचा वापर प्रतिमा म्हणून करत असते. ती प्रतिमा असते म्हणून तिला अनेक अर्थ असतात. अशी अनेकार्थकता, व्यवहारातल्या वाच्यार्थापेक्षा वेगळा व्यापक, विस्तारित, व्यंग्यार्थ हाच कवितेचा आत्मा असतो. हीच कवितेची सार्थकता व महात्मता असते. त्यामुळे व्यवहारातील शब्द व भाषा हे कवितेत कसे सर्जनशील रूप घेते त्याचा शोध घेणे म्हणजे कवितेची भाषाशैली अभ्यासणे होय.

आता आपल्याला अजीम नवाझ राही यांच्या पाचही कवितातल्या शब्दांचा अभ्यास करून भाषाशैली शोधायची आहे.

**'दुष्काळ: काही दाहक संदर्भ'** या कवितेत सुक्या दुष्काळानंतर गावाचे, शेतीचे आणि त्यातील माणसांचे विदारक दर्शन घडते. मात्र त्याची विदारकता कवीने वापलेल्या प्रतिमांमुळे अधिक गडद होते. उदा. हंगामाविषयी उच्चारू नको शब्द, गर्भारते उद्याची काळजी, तुझ्या डोळ्यांत निद्रेची पालखी, येण्याच्या वाटा गजबजल्या आक्रोशाने अशा वाक्यरचनांमुळे अनुक्रमे शेतकरी आणि गुरे यांची दारुण अवस्था साकार होते. घरे उदासवाणी

कळा पांघरून, वस्त्या प्रश्नांकित काळोखात बुडाल्या खोल, पारावरच्या म्हाताऱ्याकोताऱ्यांच्या चर्चा, गप्पा, क्षीण डोळ्यांत भाकरीची आकृती अशा रचनांमुळे दुष्काळाचे घरातील, गावातील माणसांवर आणि जुन्या जाणत्या पिढीवरही काय भयावह परिणाम झालेले आहेत, ते कळते.

केवळ रचनाच नव्हे, कितीतरी नव्या प्रतिमा व शब्द यांची योजना कवीने केलेली आहे. आतडे पिळवटणारी गाथा, धुकाळून रानवाटा, धास्तीची पेरणी, चतुर ज्योतिषाची रिकामी झोळी, दुष्काळ चेहरा अशा नव्या प्रतिमांमुळे कवितेतील ग्रामीण अवकाश व दुष्काळाची तीव्रता अधिक समर्पक होत जाते.

**'जातीय दंगल: १२ भानगडींची १३ वळणे'** या कवितेत 'गढूळलेलं पाणी पूर येण्याची शक्यता वर्तवतं', 'बेकरीसारख्या धगधगणाऱ्या मेंदूतून', 'प्रतिमा प्रतीकांच्या विटा निखळायला होते सुरुवात', 'वातावरणाच्या कागदावर घुमतात भाषेच्या किंकाळ्या', 'दंगल म्हणजे वडिलोपार्जित सौजन्याचा मोडलेला कणा'- अशा रचनेतून दंगलीचे वास्तव नेमकेपणाने व्यक्त होत जाते. 'माणुसकीचे व्याकरण', धास्तावलेली पाखरे;, एकोप्याच्या मानेवरून; 'जातविरहित सौजन्य', 'वाक्यांची झाडे', 'ऋणानुबंधाचा ढासळलेला कणा', 'सूर हरवलेला सलोख्याचा पावा' अशा कितीतरी नव्या शब्दांची रचना करून कवीने दंगलीनंतरचे दहशतीचे, असुरक्षितेचे वातावरण समर्पक वर्णन केले आहे.

**'सुरक्षेची हमी देणारा कळपवाद,'** या कवितेत 'आपुलकीच्या मजारीवार आहे बिरादरीचा ग्लाफ', 'सहानुभावांच्या दगडांवर जातीयतेचा शेंदूर' या रचनांमधून मुस्लीम आणि हिंदू यांच्या मूळ सहिष्णू धर्मात नवी विद्वेषाची पेरणी कशी झाली आहे, ते अचूकपणे सांगितले आहे. 'सुकलेला भोपळा जमिनीवर आदळावा अन्बियांची व्हावी पांगापांग' अशा रचनेतून कवी आपल्या मनातील विचारांचा विस्कळीतपणा सांगतो. 'मोहोळ हुलवणाऱ्यांना नसते मधमाशा बेघर झाल्याची खंत' असे म्हणत समाजकंटकाचे निर्दयी मन व्यक्त करतो. या शिवाय 'प्रश्नचिन्हांची कफनी', 'कपाळ करंटी दैनंदिनी', 'जळूची वंशावळ', 'बिरादरी असणारे सजातीय', 'सुरक्षेची हमी देणारा कळपवाद' अशा नव्या प्रतिमा-संबंध योजना करत ते दूषित सामाजिक वातावरण कवितेत  अधिक गडद करत जातात.

**'मोडतोडीतून डागडुजीची भाषा शिकताना'** या कवितेतही भुकेल्याला गाठीची शेव देणारी माणसं अशा रचनेतून गरीब माणसांजवळ असलेली दयेची व सहिष्णूतेची भावना व्यक्त केली आहे, गैरसमजाच्या केरकचऱ्यांनी खचाखच भरले सामाजिक मूल्यमापनाचे नितळ डोळे असे म्हणत अफवा व गैरसमजुतीने मुस्लिमांबद्दल समाजाचा दृष्टिकोण कसा बदलतो हे मार्मिकपणे व्यक्त केले आहे. खुन्नसखोर शब्दांनी बांधली जिभांच्या शेंड्यावर घरटी अशी ओळ कवीच्या सर्जनशील प्रतिभेची साक्ष पटवते. आधी शब्दांनी द्वेष निर्माण केला जातो आणि मग दंगली घडवल्या जातात. म्हणजे आधी भाषा आणि नंतर कृती घडवली जाते. 'फिनिक्सच्या राखेचा टिळा', 'अपमानाचा जहरी खिळा', 'लोळावं वेदनांच्या गुदगुल्यांनी', 'जखमांना सारवलेली सबुरी' अशी कितीतरी नवी प्रतिमासृष्टी कवी आपल्या कवितेत उभारत जातो. ज्यातून दोन समाजातील विद्वेषाचे आणि दुभंगलेपणाचे वातावरण अधोरेखित करीत जातो.

**'मोहल्ला, पक्षी आणि कातरवेळ'** या कवितेत 'पेरल्या पक्षांनीच कवितेत माझ्या खडकाळ लकेरी गाण्यांच्या ओलसर' असे म्हणत आपले 'वाळवंटांसारखे खडकाळ आयुष्य कवितेनेच ओलसर केले आहे' असे सांगत कवितेच्या निर्मितीविषयीची कृतज्ञता व्यक्त झाली आहे. 'असते ज्यांना जंगलवाचनाची सवय वागतात ते वस्त्यांत सौजन्यशीर' अशा रचनेतून निसर्गाशी एकरूपता हाच मानवी माणुसकी जिवंत ठेवण्याचा सांधा असतो ते सांगितले आहे. ही कविता वैचारिक आणि तात्त्विक असली तर ती प्रचारी व बोजड होत नाही त्याचे कारण राही यांची अशी शैलीच होय. 'मन व्यावहारिक धुक्यात वेढलेलं' असणे, 'बीजे षडयंत्राची पेरणे', 'बक्षीस म्हणून चोचभर दाणे मिळवणे', 'खैरातीत डाळरोटी नाकारणे' असे कितीतरी वाक्प्रचारही राही यांनी कवितेत घडवले आहेत. 'उंबऱ्यावर जळालेली घरे', 'ओसरलेले दातृत्वाचे उधाण', 'लागली आग्रहाला ओहोटी' अशा शब्दयोजनेतून दंगलीमुळे सामाजिक सौहार्दाचे बिघडलेले वातावरण अचूकपणे सूचित केले आहे.

अंजली कुलकर्णी यांच्या मते, 'अजीम नवाज यांच्या कवितेची भाषा उत्कटतेनं भरलेली आहे. तिच्यात प्रचंड आवेग आहे. कवी आपल्या आतला सगळा कल्लोळ, आकांत आणि अशांतता शब्दा-शब्दांत ओततो. त्यामुळे त्यांची ही समस्त कविता संवेदनांनी भरलेली होते. ओसंडत्या वेदनेनं जणू कवितेचा कंठ दाटून येतो. कधी स्वगतासारखी व्यक्त होते, तर कधी गप्पा मारल्यासारखी बोलते.आशयघन, सुंदर, चपखल शब्दयोजना ती जपते.' (अंजली कुलकर्णी : लोकसत्ता, १५ एप्रिल, २०१८)

अशाप्रकारे नवी वाक्यरचना, नवे शब्द, नव्या प्रतिमा, नवे वाक्प्रचार, नवे शब्दसंधी यांनी अजीम नवाझ राही यांची भाषाशैली समृद्ध आहे.

◆ **समारोप :**

अजीम नवाझ राही यांच्या एकूण पाच कविता त्यांच्या तीन वेगवेगळ्या कविता संग्रहातून घेतलेल्या आहेत. हे तीन कविता संग्रह वेगवेगळ्या साली लिहिले गेले आणि त्यातून प्रकटणारा आशय भिन्न भिन्न असला तरी काही समान सूत्रे त्यांच्या कवितांत आढळतात. या पाचही कवितांमधून कवीचे धर्माने मुस्लीम अल्पसंख्यांक असणे, त्याचे असुरक्षित जगणे,त्याचा मोहल्ला आणि त्याचा गाव यांतील संस्कृतीतील एकूणच संस्कृती, आणि बहुसंख्यांकांच्या धर्म-जातीचे अल्पसंख्यांक समुदायावर असलेले दडपण, दहशत व भीती प्रकटताना दिसते. धर्मद्वेष, जातिद्वेष आणि धार्मिक दंगली यांमुळे मोहल्ल्यातील सामाजिक सलोखा कसा उद्ध्वस्त होतोआणि गावाची सहिष्णूता, भूतदया ही मूल्येही कशी बदलत गेलेली आहेत याचे सूचन केले जाते. सनातन त्यागाच्या व समतेच्या मूल्यांकडून गावही आता कसे शहरी डिजिटल संस्कृतीकडे वळत हिंसा आणि क्रौर्य मूल्यांकडे वळत चालले आहे, त्याचा शोध या कवितेत आहे. मात्र शेवटी कवीला हा तुटलेला सामाजिक-धार्मिक सलोख्याचा धागा पुन्हा जोडला जाईल हा आशावादही त्यांच्या कवितेतून प्रकटताना दिसतो. हे सारे साकारण्यासाठी ही समर्पक अशी सर्जनशील शैली त्यांच्या कवितेने घडवली आहे.

अशाप्रकारे अजीम नवाझ राही यांच्या कवितेची आशयसूत्रे सांगता येतात.

### ३.२.२ कल्पना दुधाळ यांची कविता :

विद्यार्थी मित्रांनो, अजीम नवाज राही यांच्या कवितेचा आशय व शैली अभ्यासल्यानंतर आता आपण कवियित्री कल्पना दुधाळ यांची कविता अभ्यासणार आहोत. त्यासाठी त्यांचा आधी परिचय करून घेऊ.

**◆ कल्पना दुधाळ यांचा परिचय :**

कल्पना दुधाळ (१९७८) या नव्वदनंतरच्या मराठी कवितेतील महत्त्वाच्या कवियित्री असून ग्रामीण आणि देशीवादी अशा दोन्ही जाणिवांच्या कविता त्या लिहित आहेत. सोलापूरच्या टेंभूर्णी येथे शेतकरी कुटुंबात जन्म. सध्या बोरीभडक ता. दौंड, जि. पुणे येथे वास्तव्य. पुण्यात पदवी शिक्षण घेत असताना कवितांचे लेखन सुरू केले. 'सीझर कर म्हणतेय माती' या पहिल्याच कवितासंग्रहाला सुमारे १३ पुरस्कार लाभले आहेत. 'धग असतेच आसपास' हा त्यांचा दुसरा कवितासंग्रह आहे. त्यांच्या कवितांचे हिंदी आणि इंग्रजीत भाषांतर झाले असून साहित्य अकादेमीच्या विविध उपक्रमातही त्यांचा सहभाग झाला आहे. त्यांना आजवर बहिणाबाई चौधरी साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र फौंडेशन पुरस्कार असे विविध मानाचे सन्मान प्राप्त झालेले आहेत.

**◆ कल्पना दुधाळ यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व व कविता :**

कल्पना दुधाळ यांच्या कवितेत शेतकऱ्यांचे दु:ख, शेतीच्या समस्या  दुष्काळ, ग्रामीण जीवन, ग्रामीण स्त्रीचे कष्ट, स्त्रीच्या अस्तित्वाचा शोध, ग्रामीण संस्कृती व नातेसंबंध लोप पावत चालल्याची खंत आणि देशीवादी जाणीव प्रकटते. डॉ. देवानंद सोनटक्के यांनी म्हटल्याप्रमाणे दुधाळ यांच्या कवितेत स्त्रीवादी जाणीव, भूमी आणि स्त्री यांच्या सर्जनाची एकात्मता आढळते. शेती आणि निसर्गावरील आक्रमण कवयित्रीला वेदनादायी आहे. हरितक्रांती आली आणि भारतीय शेती मुळातून बदलली. पण या बदलाने शेतकऱ्यांचे भावविश्व आणि जीवनविश्वही बदलून गेले. अधिक नफा, अधिक फायदा, अधिक उत्पादन या नादात कृषिसंस्कृती बदलली याचे दु:ख कवयित्रीला वाटते. (देवानंद सोनटक्के, प्रस्तावना, सीझर कर म्हणतेय माती,पृ. १७) म्हणजे दुधाळ यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वात अस्सल भारतीय मूल्ये व परीघ आहे. आधुनिक जीवनाच्या मूल्यांपेक्षा आपल्या संस्कृतीतील देशीवादी उच्च मूल्यांतूनच सांस्कृतिक दुभंगलेपण जोडू शकतो अशी जाणीव त्यांच्या कवितांतून प्रकटत जाते.

### ३.२.२.१ विषय विवेचन :

मित्रांनो, आपल्या अभ्यासक्रमात दुधाळ यांच्या 'बाय आणि गाय', 'झुलत्या फांदीला गं', 'घोषणा', 'खस्ता' आणि 'धग असतेच आसपास' या पाच कविता समाविष्ट आहेत. शेती आणि गावगाडा ही ग्रामीण कवितेत सामान्यपणे असलेली केंद्रे याही कवितेत आहे. मात्र सोबतच त्यांची ग्रामीण स्त्री स्वत:च्या अस्तित्वाचा शोध सुद्धा घेते, हे महत्त्वाचे सूत्र या कवितेतून प्रकटते.

**१) 'बाय आणि गाय'** या कवितेत ग्रामीण स्त्रीचे आणि गायीचे जगणे यांचा शोध घेत स्त्रीच्या अस्तित्वाबद्दलचे प्रश्न उपस्थित केले आहे. आपल्या गायीसाठी स्त्री दुसऱ्याच्या बांधावरचे गवत कापते, तेव्हा

तिच्या घरच्या गायीचा विचार न करता शेताचा मालक कापलेले सर्वच गवत हिसकावून घेतो. जेव्हा गाय गवतात नेऊन बांधली जाते तेव्हा रान तुडवतेय म्हणून हाकलून लावतात. त्यामुळे मातीला, गायीला आणि स्त्रीला तिच्या मालकाच्या विरुद्ध जाण्याचा अधिकार नाही; तिघीही मालकाच्याच दावणीला बांधलेल्या आहेत, असे कवयित्रीला वाटते.

पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीला आणि मालकप्रधान शेती व्यवस्थेत मातीला,गायीला स्वातंत्र्य नाहीच. उलट उपयुक्तता हाच त्यांना निकष लावला जातो. ज्या दिवशी माती नापीक होते आणि गाय व बाईची उपजाऊ क्षमता संपते, त्या दिवशीच त्यांची किंमत कमी होते. त्यांना स्वातंत्र्य नाही आणि त्यामुळे व्यवस्थेविरूद्ध विद्रोह करण्याचे बळ नाही. म्हणून माती नापीक झाली की, पडिकात कुणी फिरकत नाही; गायीच्या पोटात तेहतीस कोटी देव असूनही शेवटी मेल्यावर कावळ्या-कुत्र्यांच्या हवाली केले जाते; तर स्त्रीला पंचनामा, पोस्टमार्टेम, विद्युतदाहिनी यापैकी एकात अंत्यसंस्कार होतो. त्यामुळे मुक्तीसाठी कित्येक शतकापासून गाय आणि बाय धावतच आहेत' असे कवयित्रीला वाटते.

> **''मी पहिली वाट... कुणीतरी येईल म्हणून**
> **...पण ही तर बिनपाण्याची विहीर**
> **कुणी साधं डोकावलं नाही**
> **हिसका देण्याएवढं बळही राहिलं नाही**
> **तोंडाला फेस आला...''**

असे गाय बाईला सांगते. त्यावेळी भाकड गायीलाही विहिरीतच ढकलून दिले जाते आणि बाईलाही, ही पुरुषीवृत्ती दिसून येते. त्यामुळेच 'धग असतेच आसपास' या कवितेतही कवयित्री 'आत्महत्येचं निमंत्रण दिलेल्या विहिरीला' असा उल्लेख येतो. या दोन कवितांमधून कवियित्रीच्या स्त्री-अस्तित्वविषयक जाणिवा प्रकटल्या आहेत.

२) **'झुलत्या फांदीला गं'**, या कवितेत एका किशोरवयीन ग्रामीण शाळकरी मुलीचे अल्लड व निरागस जीवन त्यात रेखाटले आहे. झावळ्या, शिंदोळ्या, चंदन, कणसं अशा शिवारातल्या शाळेत तिला जे स्वातंत्र्य आहे. ते 'वढ्याच्या पल्याड' व 'लोखंडी कवाडं असलेल्या' शाळेत नाही, त्यामुळे ती शाळा तिला कोंडवाडाच वाटतो आहे. एकीकडे ती रानाच्या शाळेत रमते तर दुसरीकडे भिंतींच्या शाळेत शिकते. त्यांची तुलनाही ती स्वाभाविक करते. त्यामुळे मोकळ्या रानात तिच्या व्यक्तिमत्त्वाचे झाड फुलत-वाढत असते. मात्र 'कौले आणि लोखंडी कवाड' असलेल्या शाळेत 'सजवू कसं गं मी छाटल्या झाडाला' असा तिला प्रश्न पडतो. आधुनिक शिक्षणाने स्त्रीच्या भोवती नवी बंधने उभी केली आहेत. असे देशीवादी आकलन कवयित्री मांडत जाते.

३) **'घोषणा'** या कवितेत भारतीय स्वातंत्र्याचा लाभ खेड्यातील स्त्रियांपर्यंत अजूनही न पोचल्याची खंत व्यक्त होते. वर्गातल्या इतर मुली प्रभात फेरीत फिरत असताना शेतकऱ्याची गरीब मुलगी मात्र चार बिस्किटांच्या

पुड्यांसाठी 'जय जवान जय किसान' घोषणा देत अनवाणी पायाने फुफाट्यात फिरत जाते. तिचा भाऊही सैन्यात शहीद होतो. तेव्हा तिला जवानाचे आणि शाहिदाचे बलिदान सारखेच आहे, याचा साक्षात्कार होतो.

दुसरीकडे ही कविता गरीब व श्रीमंत यांतील भेदाची दरीही व्यक्त करते. प्रभातफेरीच्या निमित्ताने ते स्पष्ट होते. एकाच वर्गात काही मुली, 'पांढरे शुभ्र बूट, मोजे, नवे कोरे गणवेश, केसांना रिबिनी आणि त्यांचे नखरे' अशा आहेत;आणि त्याचवेळी अनवाणी पायांनी कचऱ्याच्या ढिगात पाय घुसवत चार बिस्किटांसाठी प्रभातफेरीत फिरणारी मुलगीही आहे; जिला उन्हाळ्याच्या फुफाट्यापासून बचावासाठीही चप्पल मिळत नाही. तिला करंजाची पाने बांधावी लागतात. मात्र तिचाच भाऊ सैन्यात शहीद होतो. म्हणजे श्रीमंतांची देशभक्ती प्रभातफेरीपुरती आणि घोषणांपुरती असते तर गरिबांची मात्र बलिदानासाठी; अशी सामाजिक विसंगतीही कवयित्री दाखवून देते.

४) **'खस्ता'** या कवितेत आपली मुलाच्या शिक्षणासाठी खस्ता खाणाऱ्या स्त्रीचे मनोगत व्यक्त होते. आपल्या उनाड मुलाच्या तक्रारी हाताबाहेर गेल्यावर त्याला वसतिगृहात ठेवायचा निर्णय होतो, मात्र मातेचे मन काळजीने पोखरते. कारण 'ढीगभर सूचना सामानात भरताना, कधी नव्हे ते सगळं ऐकून त्याचं शांत शांत बसणं' तिला जड जाते. त्याची आठवण तिला खायला उठते आणि कोणत्याही आईबापांनी लेकरासाठी खाल्लेल्या खस्ता वाया जाऊ नये म्हणून प्रार्थना करते.

श्रीखंड-पुरीने भरलेले ताट असूनही मुलाच्या आठवणीने माउलीच्या पोटात खास जात नाही. आपलं उनाड पोरगं आठवत राहते. आपणच तक्रार करून त्याला शिस्त लागावी म्हणून वसतिगृहात ठेवले आणि त्याची बॅग भरत, त्याला सूचना देत त्याची पाठवणी करते. वसतिगृहात जातानाची मुलाच्या मनाची घालमेल आणि गेल्यानंतरची आईची घालमेल असे द्वंद्व या कवितेत टिपले आहे.

५) **'धग असतेच आसपास'** या कवितेत पुन्हा स्त्रीच्या अस्तित्वाचा शोध आहे. तिला आयुष्यात कायमच नकार, अवहेलना वाट्याला येते तरी ती जगण्याला नकार देत नाही. 'गाभाऱ्यात प्रवेश नसला तरी देवपूजा' करते. होरपळणारे वास्तव वाट्याला आले तरी आत्महत्या करीत नाही. भूमीशी असलेले तिचे सृजनशील नाते ती तोडत नाही. कारण चार चिमुकले हातच तिला शहाण्यासारखे बळ देत जाते आणि 'वस्तूंसारखी माणसं बदलता येत नाहीत,धग रक्तात असते, ती शोषून संपत नाही' अशी जाणीवही तिला होते. एखादी लहानशी ठिणगीही पुढच्या स्फोटाला पुरेशी ठरावी इतकी धग आपल्यात आहे याचा तिला साक्षात्कार होतो. कसा होतो हा साक्षात्कार?

पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीला स्वातंत्र्य नाही. तिला धार्मिक व्यवहारात गुंतवले जाते; पण धार्मिक स्वातंत्र्य दिले जात नाही. आयुष्याची शर्यत मात्र तिच्याच मागे आहे. त्यात तिला अनेकदा नैराश्य येत जाते, मात्र आपणही जामिनीसारखे नवे सृष्टीचे सर्जन करीत असतो. त्यामुळे नुसते स्त्रीत्व जाचक असले तरी मातृत्व मात्र 'स्वतःच्या सावलीसारखे' अभिन्न आहे. आपल्यातच 'आप' (जल-पाण्याचा अंश), 'तेज' (धग), 'वायू'

(वादळ), 'पृथ्वी' (भूमी) आणि 'आकाश' (वाफ) ही पंचतत्त्वे सामावलेली आहेत असा तिला साक्षात्कार होतो. सृष्टी तत्त्व, निसर्ग तत्त्व आणि आपण एकरूपच असून आपल्यातच निर्मितीचे सुंदर क्षण आहेत याची जाणीव तिला होते आणि त्यातून स्त्रीच्या अस्तित्वाचा साक्षात्कार तिला होतो. कल्पना दुधाळ आपल्या कवितेत स्त्री अस्तित्वाचा शोध घेत असल्या तरी त्या पाश्चात्य स्त्रीवादी नाहीत; तर भारतीय स्त्रीवादी कवियित्री आहे. त्यामुळे त्यांची कविता जहाल स्त्रीवादाशी नाते सांगत नाही, तर मवाळ स्त्रीवाद व्यक्त करते, नाते सांगते, हेही लक्षात घेतले पाहिजे.

अशाप्रकारे कल्पना दुधाळ यांच्या कवितेचे विवेचन करता येते.

**◆ कल्पना दुधाळ यांची भाषाशैली :**

ग्रामीण आणि देशीवादी परिसराशी संबंधित प्रतिमाविश्व व स्त्री–सापेक्ष शब्दयोजना हा कल्पना दुधाळ यांच्या भाषाशैलीचा विशेष आहे. 'कृषिकेंद्रित प्रतिमाविश्व आणि भाषिक रूपे हा या कवितेचा महत्त्वपूर्ण विशेष आहे.' असे निरीक्षण एकनाथ पाटील यांनी नोंदवले आहेच.(एकनाथ पाटील, प्रस्तावना, काव्यगंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ३५)

'बाय आणि गाय' या कवितेत 'रवंथाबरोबर दातही विरघळून गेले', 'हिसका देण्याएवढं बळ राहिलं नाही', 'जन्मभर दावणीला बांधलेलो' अशा वाक्यरचनेतून स्त्रीचे, गायीचे जगणे व गुलामी सूचित केली आहे. 'शरीरातून शरीर बाहेर पडणं', 'रुजव्याची माती नापीक होणं', 'चढणीची आडवाट उरकता उरकत नाही' अशा शब्दयोजनेतून अनुक्रमे स्त्री, माती आणि गाय यांच्या अवस्था सूचित केल्या जातात. तर 'चिकटलेले रक्तपिपासू गोचीड', 'घोंघावणाऱ्या गोमाशा' यांतून पुरुषी प्रतिमा सूचित केल्या आहेत.

'झुलत्या फांदीला गं' या कवितेत किशोरवयीन अल्लड मुलीचे मनोगत आले आहे. त्यासाठी कवितेच्या ओळीही त्याला संवादी अशा लहान लहान वापरल्या आहेत शिवाय त्यात 'झावळ्या वाकल्या गं, शिंदोळ्या पिकल्या, चंदन चावून गं, जिभल्या रंगल्या' अशा लोकगीतसदृश्य ओळी वापरल्या आहेत. 'कौलाचं आभाळ', 'लोखंडी कवाडं' अशा प्रतिमांमधून शाळा नावाच्या आधुनिक व्यवस्थांनीही स्त्रीचे देशी स्वातंत्र्य बाधित केले आहे. हे सूचित केले आहे.

'घोषणा' कवितेत 'नवे कोरे गणवेश', 'करकरीत रिबिनी' लावलेल्या मुली एकीकडे आणि 'चार बिस्किटांसाठी गावभर फिरणाऱ्या', 'कारंजाची पानं पायाला बांधून शेळ्यांच्या मागे जाणाऱ्या मुली दुसरीकडे असे भारतीय स्वातंत्र्याचे अपयश या विरोधी रचनांमधून बेमालूमपणे सूचित केले आहे. 'खस्ता' कवितेतील आईचे स्वत:लाच कुरतडून खाणारे मन, नाकपुड्या फुगवत गिळतो आवंढा, तोंडातच फिरतात घास, ढीगभर सूचना सामानात भरताना अशा शब्दांत व्यक्त होते. आणि 'धग असतेस आसपास' धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बंधने आणि दुसरीकडे त्या विरुद्ध बंड करू पाहणे मन हा सूक्ष्म संघर्ष व्यक्त करण्यासाठी साधी स्वत:ची सावली सोडून पाळता येत नाही या अचूक शब्दयोजनेने सूचित होतो. 'आत्महत्येचे निमंत्रण', 'मुरमात

खुरपं घुसल्यागत' अशा शब्दांतून स्त्रीच्या जगण्याची कोंडी सूचित केली आहे. 'दरवेळी भाजतंच असं नाही, पण धग असतेच आसपास' असे म्हणत स्त्रीच्या आंतरिक ऊर्जेची व स्वातंत्र्य अस्तित्वाची जाणीव चपखलपणे व्यक्त केली आहे.

◆ **समारोप :**

कल्पना दुधाळ या ग्रामीण कवयित्री असल्या तरी त्यांच्या कवितेत भारतीय मवाळ स्त्रीवाद येतो, त्यामुळे ग्रामीण स्त्रीचे दुःख सांगत असतानाच त्या स्त्रीच्या अस्तित्वाचा शोध घेत जातात. त्यातून सृजनशील असलेले भूमितत्त्व, स्त्रीतत्त्व आणि प्राणितत्त्व त्या शोध जातात. पंचमहाभूते आणि निसर्ग स्त्रीत्वातच आहे, असा साक्षात्कारही त्यांच्या कवितेत येतो. तसेच एका वत्सल मातेचे मनही त्यांच्या कवितेत प्रकटत जाते. स्त्रीच्या कुमारी, पत्नी आणि माता अशा त्रिविध भूमिकांची संवेदनशीलता त्या कवितेत साकारतात. शिवाय स्वातंत्र्याची इतकी वर्षे होऊनही स्त्रियांची गुलामी नष्ट न झाल्याची खंतही त्या कवितेत व्यक्त करीत जातात. आपल्या आशयाला अतिशय पूरक अशी त्यांची भाषाशैलीही त्यांच्या कवितेत येते आहे.

## ३.३ शब्दार्थ व टिपा :

१. **जागतिकीकरण** – जागतिक व्यापाराच्या संदर्भातील वस्तू-खरेदी विक्री करण्याच्या संदर्भातील जागतिक धोरण

२. **जात्यंध** – जातिद्वेषाने आंधळा झालेला

३. **धर्मांध** – धर्मद्वेषाने आंधळा झालेला

४. **अजान** – मुस्लीम धर्मातील अल्लाची आळवणी करण्याची प्रार्थना

५. **उपभोगवाद** – भोवतालचे जग व वस्तू- व्यक्ती केवळ आपल्या उपभोगासाठी आहे मानणारी भोगवादी वृत्ती

६.**वस्तुवाद** – भोवतालच्या जगातील व्यक्तिपेक्षा वस्तु महत्त्वाच्या मानण्याची वृत्ती.

७.**चंगळवाद** – चंगळवाद म्हणजे पैशांचा अपव्यय. इतरांचा विचार न करता भरपूर खर्च करून चैन करण्याची उधळी वृत्ती.

८. **डिजिटल संस्कृती** – मानवी संस्कृतीच्या पलीकडची तंत्रज्ञानाची आभासी वास्तवाची संस्कृती

९. **देशीवाद** – ही एक विचारपद्धती आहे. माणूस, निसर्ग, त्याचा प्रदेश, त्याची मूल्ये त्या त्या भूभागांशी निगडीत असते, असे मानणारा व प्रागतिक आणि आधुनिक व्यवस्थांना विरोध करणारा हा एक वाङ्मयीन वाद आहे.

१०. **स्त्रीवाद** – स्त्रीवाद म्हणजे लिंगभेद झुगारून स्त्री-पुरुष समानतेकडे वाटचाल करणारा विचारप्रवाह आहे. सामान्यतः जरी स्त्रीवाद ही पुरुषविरोधी चळवळ समजली जाते. त्यामुळे ही स्त्रियांचे ऐतिहासिक दुय्यमत्व उजेडात आणून हे शोषण संपवण्याचा प्रयत्न करते. ही एक सामाजिक, राजकीय जाणीव आहे.

**११. पंचमहाभूते –** सांख्यदर्शन नावाच्या तत्त्वज्ञानानुसार सर्व भौतिक जग, सजीव व निर्जीव पदार्थ, आपले शरीर पाच मूळ तत्त्वांपासून (द्रव्यांपासून) तयार झाले आहे असे मानतात, या पाच तत्त्वांना पंचमहाभूते असे म्हणतात.पृथ्वी, आप (जल), तेज (अग्नी), वायू, आकाशही ती पाच तत्त्वे होत.

**१२. सामाजिक सौहार्द –** समाजातील सलोखा.

## ३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

मित्रांनो, आता आपण राही आणि दुधाळ यांच्या कवितेच्या आधारे काही नमुना प्रश्न उपस्थित करून त्याचा शोध घेऊ.

### (अ) वस्तुनिष्ठ प्रश्न :

१. अजीम नवाज राही यांच्या कवितेत दाहक संदर्भ हा शब्दप्रयोग कोणत्या समस्येसंदर्भात आला आहे?

(अ) स्त्री समस्या (ब) अस्पृश्यता (क) दुष्काळ (ड) दंगल

२. उपाशी उंदरांचा पेवात धुडगूस असा उल्लेख कोणत्या कवितेत आहे?

(अ) दुष्काळ: काही दाहक संदर्भ (ब) जातीय दंगल: १२ भानगडींची १३ वळणे

(क) सुरक्षेची हमी देणारा कळपवाद (ड) मोडतोडीतून डागडुजीची भाषा शिकताना

३. जातीय दंगलीच्या रात्री कशाच्या विटा निखळायला सुरुवात होते?

(अ) मंदिराच्या (ब) प्रतिमा-प्रतीकांच्या (क) मशिदीच्या (ड) घरांच्या

४. अस्वस्थ वातावरणातूनच माझी कविता जन्मास येते असे, कवीने कोणत्या कवितेत आहे?

(अ) सुरक्षेची हमी देणारा कळपवाद (ब) जातीय दंगल : १२ भानगडींची १३ वळणे

(क) दुष्काळ: काही दाहक संदर्भ (ड) मोडतोडीतून डागडुजीची भाषा शिकताना

५. दोन भाषांचा प्रवास कौतुकास पात्र ठरत नाही, हे विधान कवीने कोणत्या दोन भाषांच्या संदर्भात केले आहे?

(अ) हिंदी-इंग्रजी (ब) उर्दू-मराठी (क) मराठी-हिंदी (ड) इंग्रजी-उर्दू

६. बाई गं, तू काय मी काय, जन्मभर दावणीला बांधलेलो हे वाक्य कोणी कोणास म्हटले आहे?

(अ) आईने-मुलीला (ब) सासूने-सुनेला (क) गायीने-बाईला (ड) बाईने-गायीला

७. 'कौलाचं आभाळ गं, लोखंडी कवाड' हा कवितेतील उल्लेख कशाचा आहे?

(अ) मंदिराच्या गाभाऱ्याचा (ब) सासरच्या घराचा (क) शाळेचा (ड) दर्ग्याचा

८. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी कोणती घोषणा दिली जात असे?

(अ) स्वातंत्र्यदिन चिरायु होवो (ब) वंदे मातरम

(क) भारतमाता की जय (ड) जय जवान-जय किसान

९. कोणती गोष्ट वाया जाऊ नये अशी प्रार्थना सूर्यनारायणाकडे केली जाते?

(अ) होस्टेलला भरलेले पैसे (ब) ताटातील अन्न

(क) ढीगभर सूचना (ड) आई-बापांच्या खस्ता

१०. आपल्यात कोणता अंश लाटेसारखा उसळतो, असे कवयित्री म्हणते?

(अ) पाण्याचा अंश (ब) धगीची ठिणगी (क) प्रेमाचा बहर (ड) स्त्रीचे दुःख

**उत्तरे :** १. (क) २. (अ) ३. (ब) ४. (ड) ५. (ब)

६. (क) ७. (क) ८. (ड) ९. (ड) १०. (अ)

**(ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१. अजीम नवाज राही यांच्या कवितेतील मोहल्ला व गावाचे चित्रण तुमच्या शब्दात लिहा.

२. अजीम नवाज राही यांच्या कवितेतून प्रकटणाऱ्या कवी मनाचा वेध घ्या.

३. अजीम नवाज राही यांनी कवितेत दुष्काळाचे चित्रण कसे केले आहे?

४. जातीय दंगलीमुळे गावातील सामाजिक सलोखा कसा बिघडतो, ते 'जातीय दंगल : १२ भानगडींची १३ वळणे' या कवितेचा आधारे स्पष्ट करा.

५. जातीच्या कळपवादी भूमिकेमुळे गावाचे सामाजिक वातावरण कसे संशयाचे बनते ते 'सुरक्षेची हमी देणारा कळपवाद' या कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

६. 'मोडतोडीतून डागडुजीची भाषा शिकताना' या कवितेतून कवीचे कोणते मनोगत व्यक्त होते?

७. धर्म आणि प्राणिमात्रांबद्दलचा दया भाव आता कसा बदलत गेला आहे, ते 'मोहल्ला, पक्षी आणि कातरवेळ' या कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

८. कल्पना दुधाळ यांच्या कवितेतील स्त्रीचा अस्तित्वशोध तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

९. कल्पना दुधाळ यांच्या कवितेतील आईच्या मनातील कल्लोळ तुमच्या शब्दांत व्यक्त करा.

१०. 'झुलत्या फांदीला गं' या कवितेतून एका अल्लड मुलीचे कोणते चित्रण आले आहे?

११. 'घोषणा' या कवितेत कवयित्रीने कोणती वेदना व्यक्त केली आहे?

१२. 'धग असतेच आसपास' या कवितेत प्रकटलेले कवयित्रीचे मन तुमच्या शब्दात उलगडून दाखवा.

## ३.५ संदर्भ ग्रंथ सूची :

१. अंजली कुलकर्णी : लोकसत्ता, १५ एप्रिल, २०१८

२.	एकनाथ पाटील, प्रस्तावना, काव्यगंध, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१९

३.	डॉ. देवानंद सोनटक्के प्रस्तावना, सीझर कर म्हणतेय माती, (दु. आ.) हर्मिस प्रकाशन, पुणे, २०१४

४.	https://m.dailyhunt.in/news/india/marathi/aksharnama-epaper-aksharna/boribhadakachya+chickanamatine+vastavache+bhan+aanale+kalpana+dudhal-newis-797228868

५.	https://www.loksatta.com/lekha-news/kalpana-dudhal-book-review-1276147/

६.	https://mr.wikipedia.org/wiki/%EO%A4%85%EO%A4%9C%EO%A5%80%EO%A4%AE%EO%A4%8%EO%A4%B5%EO%A4%BE%EO%A4%9C%EO%A4%9C%EO%A4%BO%EO%A4%BE%EO%A4%B9%EO%A5%80

७.	डॉ. किशोर सानप, अजीम नवाज राही,

❑❑❑